दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
*(आष्टी) वर्धा *बुधवार, १३ मे २०२६ *वर्ष ४ थे *अंक १२० *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

भटक्या श्वानांसाठी अन्नदान उपक्रम



वर्धा : बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी (वर्धा) येथील प्राणी कल्याण संघ तर्फे भटक्या भटक्या श्वानांसाठी अन्नदान उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्नेहल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.संघ प्रमुख कांचन वानखेडे व विद्यार्थी अध्यक्ष नोमन चव्हाण यांच्या समन्वयातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत जुना पाणी परिसरापासून ते आर्वी नाका पर्यंतच्या संपूर्ण भागात भटक्या श्वानांसाठी अन्न पुरविण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील प्राण्यांना मोठा दिलासा मिळाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून गडचिरोलीत विमानतळ

जमीन संपादनासाठी १०४ कोटींच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता

नागपूर : मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व दूरदृष्टीतून गडचिरोली येथे विमानतळ उभारण्यात येत आहे. नियोजित विमानतळाच्या विकासासाठी शिरापूर चक, गुरुवळा, हिरापूर आणि राखी या गावांमधील सरकारी, खाजगी व वन विभागाच्या अखत्यारितील ३११.८१ हे.आर. जमीन संपादीत करण्यासाठी १०४ कोटी ४८ लाख ६४ हजार २३९ रुपयांच्या खर्चास राज्य शासनाने आज प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.



महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने नियोजित गडचिरोली विमानतळासाठी शिरापूर चक, गुरुवळा, हिरापूर आणि राखी या गावांमधील सरकारी, खाजगी व वन विभागाची ३११.८१ हे.आर. जमीन संपादीत करण्याकरिता १०४ कोटी ४८ लाख ६४ हजार २३९ रुपयांच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यते ठेवला होता. या समितीच्या ८ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

या शासन निर्णयानुसार २४५.७५ हे. आर. खाजगी जमिनीच्या भूसंपादनासाठी ७६ कोटी ९९ लाख ७४ हजार ७९९ रुपयांच्या आणि ३४.६८ हे.आर. वन जमीन वळती करण्यासाठी १० कोटी ७ लाख ४५ हजार ४०० रुपयांच्या अशा एकूण ८७ कोटी ७ लाख २० हजार १९९ रुपयांच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उर्वरित रक्कमेत भूसंपादन कायदा २०१३ नुसार उपविभागीय अधिकारी यांचा ३ टक्के आस्थापना व ३ टक्के सोईसुविधा खर्च, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचा आस्थापना खर्च ४ टक्के आणि प्रकल्प खर्चात होणारी १० टक्के अंदाजित वाढ यांचा समावेश आहे.

या शासन निर्णयानुसार गडचिरोली जिल्हाधिकारी यांनी ३१.३८ हे.आर.जमीन विनामोबदला महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला ३११.८१ हे.आर. जमीन संपादनासाठी भूसंपादन संस्था आणि अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात येत असल्याचे तसेच जिल्हाधिकारी गडचिरोली यांना जमीन संपादनासाठी प्राधिकृत करण्यात आल्याचे यात स्पष्ट केले आहे.

या शासन निर्णयानुसार नियोजित गडचिरोली विमानतळाच्या विकासासाठी मौजे मुरखळा, पुलखल व कनेरी या गावांमधील जमिनीचे भूसंपादन करण्याकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस अंमलबजावणी यंत्रणा, भूसंपादन संस्था तसेच जिल्हाधिकारी गडचिरोली यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्याबाबत १३ डिसेंबर २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे.



सेलू येथे लवकरच होणार उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय

गृह राज्यमंत्री डॉ. भोयर यांच्या पुढाकार, जिल्हा पोलीस दल होणार गतीमान

वर्धा : पोलिस विभागातील वर्धा उपविभागातील पोलिस ठाण्यांची वाढलेली संख्या व वाढता कामाचा बोजा लक्षात घेऊन राज्याचे गृह राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारामुळे सेलू येथील लवकरच उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय होणार आहे. या संदर्भात मंगळवारी मुंबई येथे गृह विभागाची बैठक पार पडली.

गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारामुळे जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येत आहे. सद्यस्थितीत वर्धा जिल्ह्यात एकूण १९ पोलीस ठाणे कार्यरत असून त्यामध्ये सुमारे १७९२ पोलीस अधिकारी व कर्मचारी सेवा बजावत आहेत. या पोलीस ठाण्यांची विभागणी वर्धा, हिंगणघाट, आर्वी आणि पुलगाव अशा चार उपविभागांमध्ये करण्यात आलेली आहे. त्यापैकी वर्धा उपविभागात वर्धा शहर, रामनगर, सावंगी मेघे, सेवाग्राम, सेलू, सिंदी रेल्वे आणि दहेगाव अशी सात पोलीस ठाणे समाविष्ट आहेत.

विशेष म्हणजे, वर्धा उपविभागात सन २०२५ दरम्यान भाग १ ते ५ अंतर्गत १०७९ तर भाग ६ अंतर्गत तब्बल २५४४ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे आणि विस्तारित प्रशासकीय जबाबदा-यांमुळे वर्धा उपविभागीय कार्यालयावर मोठ्या प्रमाणात कामाचा भार निर्माण झाला होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. पंकज भोयर यांनी स्वतंत्र सेलू उपविभाग निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. पोलिस अधीक्षक कार्यालयाच्यावतीने या बाबत गृह विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. प्रस्तावानुसार सेलू, सेवाग्राम, सिंदी रेल्वे आणि दहेगाव या चार पोलीस ठाण्यांचा समावेश करून स्वतंत्र सेलू उपविभागीय पोलीस कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे. तर वर्धा शहर, रामनगर आणि सावंगी मेघे ही पोलीस ठाणे विद्यमान वर्धा उपविभागातच कायम राहतील. याशिवाय नव्या उपविभागासाठी १ उपविभागीय पोलीस अधिकारी, १ पोलीस उपनिरीक्षक आणि इतर ८ पोलीस अमलदारांच्या पदांना मंजुरी देण्यात येणार आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. मंगळवारी या संदर्भातील बैठकी मंत्रालयात पार पडली. बैठकीला अपर पोलीस महासंचालक प्रवीण साळुंखे, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पडवळ, पोलीस उपमहानिरीक्षक मोहदा पाटील , पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल तसेच गृह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जन्मण्याचा हक्क हिरावणारे तुम्ही कोण.... अवैध गर्भपात करणाऱ्या वर कठोर कारवाई....



आष्टी शहीद : राज्यात स्त्री जन्माचे स्वागत होत असतानाच दुसरीकडे काही नफेखोर डॉक्टर आणि मध्यस्तांच्या टो ळ्या स्त्रीभ्रूणहत्येचा कलंक कायम ठेवत आहेत या गंभीर प्रवृत्तीला कायमचा अटकाव करण्यासाठी आता अत्यंत कठोर पवित्रा घेतला आहे गर्भलिंग निदान आणि अवैध गर्भपात करणाऱ्या वर प्रसूतीपूर्व निदान तंत्र अंतर्गत अधिक कठोर कारवाई करण्यात येणार आहे

. .... तक्रार देणाऱ्याला लाखाचे बक्षीस.....

अवैध गर्भलिंग निदान किंवा गर्भपाताची खात्रीशीर माहिती देणाऱ्या सामान्य नागरिकांसाठी सरकारने प्रोत्साहन योजना राबविली आहे माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवले जाईल आणि माहिती खरी ठरल्यास त्या व्यक्तीला एक लाख रुपये पर्यंतचे बक्षीस दिले जाईल

जर आपल्या परिसरात असा प्रकार घडत असेल तर टोल फ्री क्रमांक अठराशे... २३३... ४४७५ यावर किंवा ऑनलाईन पोर्टल स्पष्टदन्ह या संकेतस्थळावर तक्रार नोंदविता येईल याशिवाय जिल्हा शल्य चिकित्सक किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील पीसीपी एन डी टी कक्षात लेखी तक्रार करता येते

सध्याच्या कायद्यात शिक्षा असली तरी पुराव्याच्या अभावी किंवा कलमांच्या शिथिलतेमुळे अनेकदा आरोपींना लवकर जामीन मिळतो खटले वर्षानुवर्षे चालतात त्यामुळे गुन्हेगाराचे मनोबल वाढते हीच त्रुटी दूर करण्यासाठी आता कठोर कायद्याचा आधार घेतला जात आहे

काही जिल्ह्यांमध्ये एजंट सोनोग्राफी सेंटर्स आणि डॉक्टर यांचे मोठे जाळे सक्रिय असल्याचे समोर आले आहे हे रॅकेट तांत्रिक पळवाटा शोधून गुन्हे करत आहे गुप्तचर विभाग आणि आरोग्य विभागाच्या वनावट ग्राहक मोहिमेमुळे अशा रॅकेटचा पर्दाफाश केला जाणार असून सहभागी असलेल्या प्रत्येकाला तुरुंगाची हवा खावी लागणार आहे

पी सी पी एन डी टी नोंदणी केल्याशिवाय लिंग निवडीसाठी कोणत्याही तंत्राचा वापर करण्यास मनाई विशिष्ट वैद्यकीय कारणासाठीच प्रसव पूर्व निदान चाचण्यांना परवानगी आहे लिंग निधनासाठी नाही शिशु चे लिंग सांगणे हा कायद्याने गंभीर गुन्हा आहे जाहिरात करणे किंवा तसा प्रयत्न करणे यावरही बंदी आहे

केवळ दंड भरून सुटका होण्याची वेळ आता गेली आहे ज्या रुग्णालयामध्ये अवैध गर्भपाताचे प्रकार उघडकीस येतील त्या रुग्णालयाची नोंदणी कायमस्वरूपी रद्द केली जाईल तसेच संबंधित डॉक्टरची मेडिकल कौन्सिल कडील प्रॅक्टिस ची सनदही रद्द करण्यासाठी सरकार पाठपुरावा करणार आहे

मोटर सायकल नालीत घेऊन पडल्याने युवकाचा जागीच मृत्यू

मोझरी (शेकापूर) : वनी(लहान) येथून सिरडकडे मोटर सायकलने येतअसताना तोल घसरून नालीत पडल्याने युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सिरड जवळ काल सोमवारी (दि.११) रात्रीच्या दरम्यान घडली.

याबाबत वृत्त असे की, सिरड येथील अविनाश गजानन शेंडे (२५) हा काम आटोपून वनी येथून सिरूड गावाकडे येत होता. एम एच ४० बी एन ६३५३ या मोटार सायकलने येत असताना त्याचा बॅलन्स घसरल्यामुळे तो मोटरसायकल सहित सिरड गावाजवळ असलेल्या नालीत कोसळला. यात त्याच्या डोक्याला जबर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळतात अल्पीपूरचे ठाणेदार विजयकुमार घुले कर्मचाऱ्यासह घटनास्थळी पोहोचले असून घटनेचा पंचनामा करण्यात आला आहे. अविनाशचा मृतदेह वर्धेच्या सरकारी दवाखान्यात शवाविच्छेदनाकरिता पाठविण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार विजयकुमार घुले यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी करीत आहे.

आमदारकीचा कार्यकाळ संपला, पण जनसंपर्क कायम! दादाराव केचे यांच्यासाठी भाजपची नवी 'ब्ल्यूप्रिंट' काय? सर्वांच्या नजरा वरिष्ठ नेतृत्वाकडे!

प्रतिनिधी/ गौरव सोमकुवर

कारंजा : आर्वी विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करणारे लोकनेते आणि भारतीय जनता पक्षाचे खंबीर आधारस्तंभ आमदार दादाराव केचे यांचा विधान परिषदेचा १३ महिन्यांचा कार्यकाळ यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. राजकारणात सत्तेपेक्षा पक्षनिष्ठा आणि शब्दाला किती महत्त्व असते, हे केचे यांनी आपल्या कृतीतून संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले आहे. त्यांच्या या कार्यकाळपूर्तीनंतर आता आगामी काळात पक्ष या अनुभवी आणि अष्टपैलू नेतृत्वाचा कोणती मोठी जबाबदारी सोपवणार, याची उत्सुकता संपूर्ण विदर्भात निर्माण झाली आहे.

?दादाराव केचे यांचा राजकीय प्रवास हा संघर्षातून झळाळून निघालेला हिरा आहे. ५ एप्रिल १९५४ रोजी आष्टी तालुक्यातील अंबिकापूर येथे एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या केचे यांनी हलाखीच्या परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांनी सुरुवातीला टायपिंगचा व्यवसाय सुरू केला, मात्र मनात असलेल्या समाजसेवेच्या ध्यासापोटी त्यांनी राजकारणात पाऊल ठेवले. १९८५ मध्ये नगरसेवक म्हणून सुरू झालेला हा प्रवास २००९ मध्ये वर्धा जिल्ह्यातील भाजपचे 'पहिले आमदार' म्हणून निवडून येण्यापर्यंत पोहोचला. २०१९ च्या निवडणुकीतही जनतेने त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करत त्यांना पुन्हा एकदा विधानसभेवर पाठवले.



?केचे यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वात मोठा त्याग गेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी पाहायला मिळाला. पक्षाने नवीन उमेदवाराला संधी दिल्यानंतर केचे समर्थकांमध्ये मोठा असंतोष होता आणि केचे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करत ऐतिहासिक शक्तीप्रदर्शन केले होते. मात्र, पक्षहित आणि वरिष्ठांचा शब्दाला मान देत त्यांनी माघार घेण्याचा निर्णय घेतला. भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे व सुधीर दिवे यांच्या मध्यस्थीने आणि देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर, केचे यांनी केवळ आपला अर्जच मागे घेतला नाही, तर भाजपच्या विजयासाठी रात्रंदिवस एक केला. त्यांच्या याच निष्ठेची पोचपावती म्हणून पक्षाने त्यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आणि त्यांना विधान परिषदेवर आमदार म्हणून संधी दिली.

?दादाराव केचे यांनी आपल्या अल्प कार्यकाळातही आर्वी आणि कारंजा मतदारसंघातील अनेक महत्त्वाचे प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते मार्गी लावले. आज त्यांचा विधान परिषदेचा कार्यकाळ संपला असला, तरी जनमानसातील त्यांचे स्थान आजही अबळ आहे. मतदारसंघातील विकासकामांचा डोंगर उभा करणाऱ्या या 'विकासपुरुषाला' आगामी काळात कोणती नवी संधी मिळते, याकडे आता सर्व राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे. 'जनतेची सेवा हाच ध्यास' मानणाऱ्या दादाराव केचे यांच्या पुढील वाटचालीसाठी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

वर्ध्यात तापमानाचा पारा ४४.२ अंशांवर; उष्णतेची तीव्र लाट कायम

वर्धा : जिल्ह्यात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत असून मंगळवारी वर्ध्यात कमाल तापमान ४४.२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. वाढत्या तापमानामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच सूर्याची तीव्रता जाणवत असून दुपारी उकाड्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण होत आहे. गत काही दिवसांपासून तापमान सातत्याने वाढत असल्याने उष्णतेची लाट अधिक तीव्र होत चालली आहे. दुपारच्या वेळेत गरम वारे वाहत असल्याने वातावरणात प्रचंड उकाडा निर्माण झाला आहे. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा तसेच ग्रामीण भागातही उष्णतेचा मोठा परिणाम जाणवत आहे. नागरिक थंड पेये, फळांचा रस, ताक व पाण्याचा अधिक वापर करताना दिसत आहेत.



डॉक्टरांनी नागरिकांना आवश्यक नसल्यास दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतमजुरांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी भरपूर पाणी पिणे, डोक्यावर टोपी किंवा कापड वापरणे तसेच हलका आहार घेण्याचा सल्ला आरोग्य विभागाकडून देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून उष्णतेपासून बचावासाठी नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

जागतिक दिवस पक्षी गणनेत वर्धा जिल्ह्यात ५८ पक्षी प्रजातींच्या नोंदी

वर्धा : ९ मे या दिवशी असलेल्या ग्लोबल बिग डे या जागतिक पक्षी गणनेच्या निमित्याने वर्धा जिल्ह्यातील येळाकेळी, जामणी, पिपरी तसेच वर्धा शहर परिसरातील विविध अधिवासात केलेल्या पक्षी निरीक्षणात ५८ पक्षी प्रजातींच्या नोंदी घेवून त्या ई-बर्डच्या संकेतस्थळावर नोंदवण्यात आल्या. यात प्रामुख्याने वर्धा जिल्ह्याकरिता ई-बर्डनुसार दुर्मिळ असलेल्या बलाकचोच धीवर (स्टॉर्क-बिल्ड किंगफिशर) याची नोंद झाली. यात महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेच्या नागपूर विभागाचे विदर्भ समन्वयक राहुल वकारे यांनी सहभाग घेतला होता.

वर्धेत नोंदवण्यात आलेल्या पक्षी प्रजातींमध्ये जागतिक आययुसीएन या संघटनेद्वारे वर्गीकरण करण्यात आल्यानुसार असुरक्षित वर्गात मोडणारे नदी सुरय (रीवर टर्न), छोटा आर्ली (स्मॉल प्रटीनकोल), पेरते हा म्हणून आवाज देणारा पावश्या (कॉमन हॉक कुकू) तसेच हिवाळी स्थलांतरित छोटा कंठेरी चिखल्या (लिटील रिंग प्लोवर), लाल पुट्ठ्याची भिंगरी (इस्टर्न रेड-रुम्पड श्वालो), रेषाळ कंठाची भिंगरी (स्ट्रीक-ब्रोटेड श्वालो) आढळले. राखी बगळा (ग्रे हेरॉन), हळदीकुंकू बदक (इंडिअन स्पॉट-बिल्ड डक) आणि काळा शराटी (ब्लॅक हेडेड आयबीस) या पक्ष्यांच्या नोंदी करण्यात आल्या.



ग्रामीण भागातील तलावांवर मोठ्या प्रमाणात मुरूम व रेतीचे उत्खनन जेसीबीच्या सहाय्याने सुरु आहे. सध्या जमिनीवर घरटे करणाऱ्या पक्ष्यांच्या विणीचा हंगाम असून त्याकरीता त्यांना सुरक्षित तलावाकाठील मोकळी सपाट जागेची आवश्यकता आहे.

उत्खननामुळे त्यांच्या प्रजननावर संकट आले आहे. तरी प्रशासनानी याबाबी लक्षात घेवून उत्खनन करावे. आनंदाची बातमी म्हणजे जामणी जवळील तलावा मधील बेटावर नदी सुरय (रीवर टर्न) यांचे मोठ्या प्रमाणात यशस्वी प्रजनन झाले.

संपादकीय



शत-प्रतिशत, मुख्यमंत्रीपदाचे दावेदार



शिवसेना उबाठाच्या नऊ खासदारांमध्ये पाच खासदार शिंदे यांच्या गळाला लागले आहेत. परंतु जोपर्यंत सहावा खासदार येत नाही तोपर्यंत हे ऑपरेशन लोटस यशस्वी होणार नाही एवढे नक्की.

राज्य विधानसभेचा मुदत २०२९ पर्यंत आहे त्यास अजून तीन वर्षांचा कालावधी शिल्लक आहे. असे असताना महायुतीमधील काही घटक पक्ष शत प्रतिशतची भाषा बोलू लागले असून मुख्यमंत्रीपदाचे दावेदारही घोषित केले आहेत.

देशात पाच राज्यांत नुकत्याच निवडणुका संपन्न झाल्या. तीन राज्यांत भाजपने मताधिक्य मिळवले आहे, तर केरळ आणि तमिळनाडूमध्ये चर्चा सुरू आहेत. अशावेळी महायुतीमधील राष्ट्रवादीचे (शिंदे गटाचे प्रवक्ते) संजय गायकवाड यांनी तर शत-प्रतिशतची बोली सुरू केली आहे. शिवसेनेमध्ये काल प्रवेश घेतलेले बच्चू कडू यांनी तर मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांचेच नाव मुकरर झाल्याचे सांगितले, तर इकडे अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार यांनी सुनेत्रा पवार या २०२९ला मुख्यमंत्री होतील असे सांगून बॅनर झळकवले आहेत. ही सर्व परिस्थिती पाहता उद्या काय होईल हे आज सांगता येणार नाही, असे शिवसेनेचे खासदार संजय जाधव म्हणतात. मात्र त्यानंतर ही शत-प्रतिशतची भाषा सुरू झाली आहे.

राज्यात शिवसेना-भाजपचे १९९९ मध्ये सरकार असताना राणे हे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते. त्यावेळी भाजपचे प्रदेश अध्यक्ष व उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांनी आपल्या आमदारांचा राणे यांना पाठींबा आहे असे पत्र शेवटपर्यंत न दिल्याने राणे मुख्यमंत्री होऊ शकले नव्हते. विशेष म्हणजे त्यावेळी विलासराव देशमुख व गोपीनाथ मुंडे हे दोघेजण जीवलग मित्र होते. विलासरावांचा पत्तास ससरू करण्यासाठी मुंडे यांनी भाजप आमदारांचे समर्थनाचे पत्र दिले नाही. याचे कारणही तसेच होते. परळी मतदारसंघातून मुंडे यांचा पराभव झाल्यानंतर ते लातूर जिल्ह्यातील रेणापूर मतदारसंघातून निवडून आले होते. त्यावेळी विलासरावांनी गोपीनाथरावांना निवडून येण्यासाठी फार मोठी मदत केली होती. त्याचाच एक भाग म्हणून मुंडे यांनी राणे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या नावाला पाठिंबा दिला नव्हता. त्यावेळी नाशिक येथील अधिवेशनात भाजपने शत-प्रतिशतची भाषा केली होती. त्यावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती, परंतु यामागे विलासराव देशमुख यांचे राजकारण होते हे पुढे स्पष्ट झाले.

देशभरात भाजप वादत असताना आजच शत प्रतिशतची घोषणा करणे म्हणजे महायुतीमध्ये बिघाड टाकण्यासारखे आहे. संजय गायकवाड यांनी शत-प्रतिशतची घोषणा करताना पुढील निवडणूक भाजप स्वबळावर लढेल, असे म्हटले होते.

देशभरात प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व संपुष्टात येत आहे. बंगाल, आसाम, पुदुचेरी, तमिळनाडू व केरळ या पाचही राज्यांत प्रादेशिक पक्षांची सर्वसहोलपट झाली. एका बाजूला जयललिता, तर दुसऱ्या बाजूला करुणानिधी असे दोन गट निर्माण झाल्यानंतर या दोन गटांकडे आलटून पालटून येणाऱ्या २० वर्षे सत्ता होती. केरळमध्ये आता काँग्रेस सत्तेवर येत आहे. बंगालमध्ये १५ वर्षे सत्तेत असलेली ममतादीदी यांची तृणमूलची सत्ता लोकांनी फेकून दिली. शेवटी शुक्रवारी राज्यपालांनी बंगालची विधानसभाच बरखास्त करून टाकली. तेथे भाजपला २०८ जागांचे बहुमत मिळाले; परंतु ममतादीदींना ते मान्य झाले नाही. दरम्यान, दुबेंद्र अधिकारी यांच्या पीएना गुरुवारी गोळ्या घालून मारण्यात आले. आज पश्चिम बंगालमध्ये परिस्थिती स्फोटक आहे.

देशामध्ये सध्या २२ राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे. भाजपचा अश्वमेध उधळला असताना शिवसेना शत-प्रतिशत म्हणत आहे. २०१९ मध्ये भाजपला १२३ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी शिवसेना व भाजप या युतीने एकत्र निवडणुका लढल्या होत्या, मात्र शेवटच्या क्षणी शिवसेनेने काँग्रेस व राष्ट्रवादीबरोबर घरोबा केला आणि अढीच वर्ष सत्ता भोगली. मात्र पुढे काय झाले? अखंड शिवसेनेमध्ये उभी फूट पडली आणि ३९ आमदार बाहेर निघून गेले. मेनकेत्यावेळी महाराष्ट्रात राज्यसभेच्या व विधान परिषदेच्या निवडणुका होत्या. त्या निवडणुकीच्या मतदानाच्या आदल्या दिवशी सुरतमार्गे गुवाहाटीला पोहचले हा इतिहास आहे.

शिवसेना व भाजप यांचे राज्य सरकार असताना अचानकपणे एका भीषण अपघातात अजित पवारांचा मृत्यू झाला आणि राजकारण बदलले. दरम्यान, राष्ट्रवादी एकीकरणाची भाषा शरद पवार गटाकडून सुरू झाली. त्यातून पुणेकिरण सिंह, अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्या. यामागे राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व प्रदेश राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुनील तटकरे यांनी मोर्चेबांधणी केली होती. शरद पवार गटाचे रोहित पवार हे अधूनमधून विरोधी वातावरण निर्माण करत होते. दरम्यान, प्रफुल्ल पटेल व तटकरे यांच्या विरोधात राष्ट्रवादीमध्ये वातावरण विघडविण्याचा प्रयत्न झाला. अजितदादांच्या मृत्यूचे राजकारण रोहित पवार यांनी दणक्यात सुरू केले होते. या पार्श्वभूमीवर आता अजितदादा पवार यांचे कनिष्ठ चिरंजीव जय पवार यांनी २०२९ मध्ये सुनेत्रा पवार या मुख्यमंत्री होतील असे भाष्य केले. एवढेच नव्हे, तर तसे बॅनरही झळकवले. विधानसभेत सध्या ४०० आमदार राष्ट्रवादीचे आहेत. हे लक्षात घेता तीन वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत सुनेत्रा पवार या मुख्यमंत्री होऊ शकतात का, हा एक प्रश्न आहे.

राज्यात भाजप-शिवसेनेचे राज्य आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पॉवरफुल होत आहेत. याभध्ये वाद नाही. प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांना पुन्हा शिवसेनेच्या प्रवेश केला आणि त्यांनीही मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे हेच विराजमान होतील असा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असे म्हटले आहे. बच्चू कडू हे आक्रमक पुढारी म्हणून ओळखले जातात. अचलपूर विधानसभा मतदारसंघातून त्यांचा भाजप आमदाराने पराभव केला. तिथून ते भाजपवर गरावलेले आहेत. एकनाथ शिंदे यांनी हे हेरुन विदर्भात आपला पाय रोवण्यासाठी बच्चू कडू यांना बरोबर घेतले. बच्चू कडू यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांच्या प्रहार संघटनेने शिवसेनेत विलीन व्हावे, अशी अट एकनाथ शिंदे यांनी टाकली होती, परंतु कडू यांनी आपली संघटना राजकीय काम न करता सामाजिक स्वरावर काम करील असे सांगून प्रहार संघटनेचे अस्तित्व कायम ठेवले. यापूर्वी शिंदे यांचा एक मोठा गट गुवाहाटीला गेला होता. त्यावेळी बच्चू कडू हे अपक्ष मंत्री म्हणून त्यात सामील झाले होते. भाजपला शह देण्यासाठी बच्चू कडू यांना शिवसेनेने घेतले असे बोलले जाते. अमरावतीमधील रवी राणा, नवनीत राणा यांच्या विरोधात या कडू यांनी संघर्ष केला होता, त्यामध्येच त्यांचा पराभव झाला. आता तेच कडू मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे हेच २०२९ मध्ये असतील, असे भाष्य केले. याबाबत खासदार संजय जाधव यांचे एक म्हणणे संयुक्तिक होते.

त्यांनी म्हटले उद्या काय होईल हे आज सांगता येणार नाही, सध्या ते शिवसेना उबाठा गटाचे खासदार असले तरी त्यांचे मातोश्रीवर पटत नाही. त्यांनी उद्या काय पडेल हे अजून स्पष्ट केले नाही. विशेष म्हणजे भाजपचा अश्वमेध देशभर उधळत असताना शत-प्रतिशत व मुख्यमंत्रीपदाचे दावेदार अशी बाष्कळ बडबड करत आहेत. त्यामुळे याचा फारसा फरक भाजपला पडेल असे वाटत नाही. मात्र एक निश्चित की एकनाथ शिंदे आपला पक्ष बाबदण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत हे नाकारता येणार नाही. नुकताच ऑपरेशन लोटसचा एक हात्मा दिल्लीमध्ये शिजला, परंतु त्याची जाहीरपणे चर्चा मुख्य ऑपरेशन लोटस बाजूला पडले. मात्र असे असले तरी शिवसेना उबाठाचे खासदार, आमदार हे एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. नुकताच मुलुंडचे शिवसेनेचे खासदार संजय दीना पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या गाडीत बसून प्रवास केला. शिवसेना उबाठाच्या नऊ खासदारांमध्ये पाच खासदार शिंदे यांच्या गळाला लागले आहेत. परंतु जोपर्यंत सहावा खासदार येत नाही तोपर्यंत हे ऑपरेशन लोटस यशस्वी होणार नाही एवढे नक्की.

समर्पण, परिश्रम आणि नियोजनाचा विजय

आधुनिक युगात निवडणुका लढविणे आणि त्यात यश मिळवणे याचे व्यवस्थापन शास्त्र तयार झाले आहे. या शास्त्राला अनेक पैलू आहेत. बूथ पातळीवरची पन्ना समिती हा भाजपच्या निवडणूक रणनीतीचा प्रमुख भाग आहे. मात्र भाजपचे हे यश अनेकांना पचत नाही.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेला दणदणीत विजय अनेकांना पचलेला नाही. ११ वर्षे मुख्यमंत्री असूनही स्वतःचा विधानसभा मतदारसंघही सांभाळू न शकलेल्या ममता बॅनर्जी, 'खेला विचारवंत' राहुल गांधी यांनी या विजयावहल शंका उपस्थित करणे अपेक्षितच होते. मात्र अनेक ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत यांनाही भारतीय जनता पक्षाचे हे निर्मळ यश भाजपला असलेल्या तीव्र विरोधामुळे पचवता येईनासे झाले आहे. काही ज्येष्ठ पत्रकारांना या विजयामागे 'गौडबंगाल' असल्याची शंका येते आहे. अशा मंडळींना ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष कधीच पराभूत होऊ नये, अशी इच्छा असल्याने त्या इच्छेपोटीच या मंडळींनी वस्तुस्थितीपासून दूर पळण्याचा मार्ग पत्करला आहे. आधुनिक युगात निवडणुका लढविणे आणि त्यात यश मिळवणे याचे व्यवस्थापन शास्त्र तयार करणे हे या शास्त्राला अनेक पैलू आहेत. या शास्त्राचा पहिला प्रयोग अरविंद केजरीवालांनी यशस्वीरीत्या सादर केला. २०१३ मध्ये पहिल्यांदाच निवडणूक लढविणाऱ्या केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत बहुमतापर्यंत जाण्याची कामगिरी केली. २०१५ मध्ये विधानसभा निवडणुकीत ७० पैकी ६७ जागा जिंकत विक्रमी यश मिळवले. तोपर्यंत आणि आजपर्यंतही भारतीय राजकारणात एवढे मोठे यश कोणी मिळवले नाही. मतदारांचा डेटाबेस तयार करणे, त्यांच्या अपेक्षा-गरजा जाणून घेऊन त्यानुसार रणनीती आखणे, समाजमाध्यमांचा वापर करून आपली विचारसरणी निर्धारित केलेल्या मतदारांपर्यंत पोहचवणे, असे हे केजरीवालांचे निवडणुकीचे आधुनिक व्यवस्थापन शास्त्र होते. गेल्या १०-११ वर्षांत निवडणुकीच्या या व्यवस्थापन शास्त्रात कालानुरूप अनेक बदल झाले आहेत. प्रशांत किशोर हे याच निवडणूक शास्त्राचे कुलगुरू मानले जातात. केजरीवाल यांनी २०१५ आणि २०२० मध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला तरी त्यांच्या विजयावर पक्कार, विचारवंतांनी शंका घेतली नव्हती. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर सहाच महिन्यांनी दिल्ली विधानसभेच्या निवडणुका झाल्या. मात्र विधानसभा निवडणुकीत मतदारांनी आप आदमी पक्षाला मोठा



जनादेश दिला. त्यावेळी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने हा जनादेश नाकारला नाही.

'आप'च्या नेतृत्वाने मतदारांशी संपर्क साधण्यासाठी अत्याधुनिक तंत्र प्रत्यक्ष अवलंबतांना वीज-पाणी बिल माफ, मोहल्ला दवाखाने, सरकारी शाळांचा दर्जा सुधारणे यासारखे लोकोपयोगी कार्यक्रम मतदारांपुढे ठेवले. निवडणुका लढविण्याचे आणि जिंकण्याचे हे तंत्र भाजप विरोधकांनी अवलंबले तर विचारवंत आणि पक्षकारांना त्या विजयात कोणतेही गौडबंगाल वाटत नाही. क्रिकेटमध्ये प्रतिस्पर्धी फलंदाजांच्या कमकुवत बाजूंचा अभ्यास करण्यासाठी त्या फलंदाजांच्या पूर्वीच्या सामन्यातील चित्रफितींचा अभ्यास केला जातो. त्याचप्रमाणे वारंवार यशस्वी ठरणाऱ्या गोलंदाजाच्या शैलीचाही अभ्यास केला जातो. निवडणुकीच्या खेळातही विरोधी पक्षांच्या कमकुवत बाजूंचा अभ्यास केला जातो.

विरोधी पक्ष जर सत्तेत असेल तर त्या सरकारविरोधातील मुद्दे जनमताचा अंदाज घेऊन शोधले जातात. त्यानुसार निवडणूक प्रचारात कोणत्या मुद्दांवर भर दिला पाहिजे, जाहीरनाम्यात कोणत्या मुद्दांचा समावेश केला पाहिजे, प्रमुख नेत्यांनी भाषणांमध्ये कोणत्या मुद्दांवर बोलले पाहिजे, अशा अनेक गोष्टींचे आकलन होऊ शकते. पूर्वी पक्ष आणि नेत्याच्या वैचारिक लोकप्रियतेच्या बळावर निवडणुका जिंकल्या जात होत्या.

२१ व्या शतकात मतदार पूर्वीप्रमाणे भाबडा राहिलेला नाही.

भारतीय जनता पक्ष संघटना सर्वतोपरी हा विचार प्रत्यक्षात आणणारा पक्ष आहे. बूथ पातळीवरची पन्ना समिती हा भाजपच्या निवडणूक रणनीतीचा प्रमुख भाग आहे. २०२१ मध्ये भाजपने प्रथमच पश्चिम बंगालमध्ये सर्व ताकदीनिशी निवडणुका लढविल्या होत्या. तोपर्यंत जनसंघ आणि भारतीय जनता पक्षाचे पश्चिम बंगालमधील अस्तित्व नाममात्रच होते. भाजपचे संघटन २०२१ मध्ये बूथपातळीपर्यंत पोहचले नव्हते. असे असतानाही २०२१ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ३८ टक्के मते मिळवली होती. ममता बॅनर्जींच्या पक्षाने २०२१ मध्ये ४८ टक्के मते मिळवली होती. बूथपातळीपर्यंत ताकदवान असलेली तृणमूलची मनगटशाही हा खुल्या वातावरणात निवडणुका होण्यातील प्रमुख अडथळा होता.

तृणमूलचे गावपातळीवरील कार्यकर्ते मतदारांना मतदानापासून प्रतिबंध करीत असत. हिंसा मागतही असेच चित्र होते. निवडणूक आयोगाने निर्भय वातावरणात मतदान व्हावे यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाचे सुमारे अडीच लाख जवान बंदोबस्तासाठी तैनाते होते. तृणमूलच्या कार्यकर्त्यांची प्रचंड दहशत केंद्रीय पोलीस दलाच्या बंदोबस्तामुळे कमी झाली. ९२ टक्क्यांपर्यंत झालेले विक्रमी मतदान हे त्याचेच द्योतक आहे. शहरी व निमशहरी भागात मोठ्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातच मतदान केंद्र सुरू करण्यामुळे मतदारांना निर्भयपणे मतदान करता आले. पडघामगच्या रणनीतीत प्रत्येक बुथवर कार्यकर्त्यांची फळी उभी करणे, पक्षाचे हक्काचे मतदान सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत हक्कान घेणे, व्हॉट्स?प युपद्वारे तृणमूल सरकारविरोधातील मुद्दांचा प्रसार करणे याचा समावेश होता. भाजप कार्यकर्त्यांच्या मदतीला विचार परिवारातील अनेक संघटनांचे कार्यकर्ते होते. तृणमूलच्या १५ वर्षांच्या राजवटीत बांगलादेशीय अनुनयमुळे निर्माण झालेला असंतोष आणि त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेपुढे उभे ठाकलेले गंभीर आव्हान पाहून विचार परिवारने आपली सारी ताकद तृणमूलच्या विरोधात मैदानात लावली होती. घुसखोरांची नावे वगळली गेल्यानंतर ममतांनी आकांडतांडव केला.

मात्र या घुसखोरांच्या भारतीय नागरिकत्वाचे पुरावे कोणालाच सादर करता आले नाहीत. ज्या मतदारसंघात 'एसआयआर'मुळे मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात वगळली गेली त्या २० मतदारसंघांपैकी १३ मतदारसंघांत तृणमूल काँग्रेसने विजय मिळवला आहे.

उन्हाळ्यात जनावरांना होणारी विषबाधा आणि उपाययोजना



उन्हाळ्यायचा दिवसांमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या काळात जनावरांमध्ये उष्माघात, पाण्यायी कमतरता, पचनाचे विकार यांसह विषबाधेच्या घटनाही वाढताना दिसतात. विषबाधा ही गंभीर समस्या असून वेळेवर उपचार न झाल्यास जनावरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांनी या विषयाबावत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.

विषबाधा होण्यायी मुख्य कारणे : उन्हाळ्यात चाऱ्यायी टंचाई निर्माण झाल्यामुळे जनावरे अनेकदा उपलब्ध असलेली कोणतीही वनस्पती खातात. याभध्ये धोतरा, आकोडा, करट, रानमेथी यांसारख्या विषारी वनस्पतींचा समावेश असू शकतो. अशा वनस्पतींचे सेवन केल्यास जनावरांना विषबाधा होण्यायी शक्यता वाढते. याशिवाय शेतात फवारणी केलेल्या चाऱ्यावर राहिलेले कीटकनाशकांचे अंश, रासायनिक खते किंवा औद्योगिक रसायनांचा संपर्क हे देखील विषबाधेचे महत्त्वाचे कारण आहे. काही वेळा कुजलेला किंवा बुरशी लागलेला चारा जनावरांना दिला जातो. अशा चाऱ्यातून तयार होणारे विषारी घटक जनावरांच्या शरीरात जाऊन गंभीर परिणाम करतात.

प्लास्टिक, कचरा, तेलकट पदार्थ किंवा रंगयुक्त वस्तू खाल्ल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. तसेच औषधांचा अति प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने वापर केल्यासही विषबाधा होऊ शकते.

विषबाधेची लक्षणे : विषबाधा झाल्यानंतर जनावरांमध्ये काही ठळक लक्षणे दिसून येतात. भूक मंदावणे किंवा पूर्णपणे बंद होणे, तोंडातून फेस येणे, लाळ गळणे, बेचैनी, इकडे-तिकडे धावणे, श्वास घेण्यास त्रास होणे, पोट फुगणे किंवा जुलाब होणे अशी लक्षणे सामान्यतः दिसतात. गंभीर अवस्थेत स्नायूंमध्ये कंप सुटणे, डोळे फिरणे किंवा अचानक मृत्यू होण्यायी शक्यता देखील असते. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तात्काळ उपाययोजना : विषबाधा झाल्याचा संशय आल्यास सर्वप्रथम जनावरांना विषारी पदार्थांपासून दूर करावे. तोंडामध्ये उरलेले विषारी पदार्थ काढून टाकावेत आणि स्वच्छ, थंड पाणी पाजावे. कोणतेही घरगुती उपाय किंवा औषधे स्वतःहून देऊ नयेत. तातडीने जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य उपचार घ्यावेत. वेळेवर उपचार मिळाल्यास जनावराचा जीव वाचविणे शक्य होते.

प्रतिबंधात्मक उपाय : विषबाधा टाळण्यासाठी शेतकरी व पशुपालकांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जनावरांना देण्यात येणारा चारा व खाद्यपदार्थ स्वच्छ व दर्जेदार असावा. कीटकनाशके आणि रसायने सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. शेतातील विषारी वनस्पती ओळखून त्या नष्ट कराव्यात. जनावरांच्या गोठ्याभोवती स्वच्छता राखणे, नियमित पशुवैद्यकीय तपासणी करणे आणि पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे.

उन्हाळ्यात जनावरांची योग्य काळजी घेतल्यास विषबाधेचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. शेतकऱ्यांनी जागरूक राहून प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहून आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. जनावरे ही शेतकऱ्यांची महत्त्वाची संपत्ती असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक पशुपालकाची जबाबदारी आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा

भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा



भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्रतिष्ठेचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनरुत्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती—हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वारणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ—चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्राचीन सिंचन विहिरी पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्त्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वावरत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकणाऱ्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी— लाकूड आणि गवताची— असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभींच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या-१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०-५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्ष्मीशेश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या काळलक्षांबद्दल मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे—सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एका रात्रीत उभारले गेले नव्हते. महणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

ाानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२-८३ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के. एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी या अनुभवाचे वर्णन 'भस्ती आणि लज्जा' असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२-१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: 'या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.'

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणगया दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, त्री काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिराला ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारताचे संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभ

मुलांच्या निरोगी भविष्यासाठी मोठी मोहीम; तंबाखूमुक्त शाळांना राष्ट्रीय पाठबळ



मुंबई : देशभरात तंबाखूमुक्त समाज निर्माण करणे आणि मुलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने आरोग्य विभागाच्या सहकार्याने 'तंबाखूमुक्त आणि निरोगी बालक – इंडिया व्हिजन' या अभियान राबविले जात आहे. या अभियानाअंतर्गत नरोत्तम सेखसरिया फाउंडेशन आणि सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे 'नरोत्तम सेखसरिया फाउंडेशन ग्रँट्स अँड अवॉर्ड्स २०२६' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी महाराष्ट्र, राजस्थान आणि इतर राज्यांतील सहा सामाजिक परिवर्तनकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये अमोल रामभाऊ काले, डॉ. जगदीशचंद्र बी. वाठार, कमलेश कुमार टेंटरवाल, नरेंद्र बालू पाटील, रवि बालाजीराव धागे आणि डॉ. श्वेता सौरभ खांडरे यांचा समावेश होता.

आरोग्य विभागाच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय मोहिमेची सुरुवात २००८ मध्ये झाली. आतापर्यंत या अभियानांतर्गत ३९ स्वयंसेवी संस्थांना (एनजीओ) सहाय्य देण्यात आले असून सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक जनजागृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ६० व्यक्तींना गौरविण्यात आले आहे. संस्थेच्या माहितीनुसार, या मोहिमेच्या माध्यमातून देशातील १३ राज्यांमधील सुमारे १५ लाख नागरिकांपर्यंत पोहोचण्यात यश आले असून ५,५०० हून अधिक शाळांना तंबाखूमुक्त घोषित करण्यात आले आहे.

तसेच 'टोबॅको-फ्री स्कूल प्रोग्राम २०२६-२७' अंतर्गत चार संस्थांना अनुदान देण्यात आले. त्यामध्ये बालाजी सेवा संस्थान, जनलोक कल्याण परिषद, धरती ग्रामोथान एवं सहभागी ग्रामीण विकास समिति आणि ग्रामीण स्वावलंबन समिति यांचा समावेश होता.

कार्यक्रमादरम्यान तंबाखूमुळे होणारे आजार, विशेषतः कर्करोगाचा वाढता धोका आणि लहान वयातच जनजागृतीचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी एनएसएफतर्फे राबविण्यात येणाऱ्या जनजागृती मोहिमांवर आधारित एक विशेष लघुपटही प्रदर्शित करण्यात आला. या कार्यक्रमास नरोटम सेखसरिया फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष जोशी, उपाध्यक्ष राजश्री कदम, सहाय्यक संचालक रीटा पावडे, तसेच गौरव अरोरा, दत्ता बालासाहेब आणि शिरीन भूटिया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच सलाम मुंबई फाउंडेशनच्या वतीने विविध राज्यांतील स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी आयोजकांनी देशभरात तंबाखूमुक्त जनजागृती मोहीम अधिक व्यापक करण्याचा तसेच शाळा आणि समुदायांमध्ये आरोग्य शिक्षण अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी काळात निरोगी आणि तंबाखूमुक्त पिढी घडविण्यासाठी हे अभियान सातत्याने कार्यरत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

आपत्ती व्यवस्थापन मान्सून पूर्वतयारी १५ दिवसात पूर्ण करा; अलमट्टी व हिप्परगीबाबत स्ट्रॉंग मॉनीटरींग गरजेचे : पालकमंत्री प्रकाश आबिटकर

मान्सून पूरस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारी बैठकीत निर्देश



कोल्हापूर (जिमाका) : मान्सून २०२६ च्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्यातील पूरस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारीचा सविस्तर आढावा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील तारागणी समागृहात घेण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यात १५ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान अतिवृष्टीचा धोका अधिक असतो, हा गेल्या २५ वर्षांचा अनुभव लक्षात घेऊन प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. अलमट्टी व हिप्परगी धरणांबाबत स्ट्रॉंग मॉनीटरींग गरजेचे असून यासाठी स्वतंत्र यंत्रणा नेमावी असा सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी वारणा धरण वगळता इतर धरणांतील पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे स्पष्ट करण्यात आले, मात्र 'अल निनो'चा प्रभाव आणि उपलब्ध पाणीसाठ्याचे सुयोग्य नियोजन करण्याबाबत बैठकीत भर देण्यात आला.

बैठकीत आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिलेल्या सादरीकरणानुसार, जिल्ह्यात ३११ गावे पूरबाधित असून ८८ गावांना भूस्खलनाचाधोका आहे.या आव्हानांचा सामना करण्यासाठी ८३८ जणांचे मनुष्यबळ, शोध व बचाव पथके आणि ४८८ निवारा केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत. जिल्हा व तालुका स्तरावर २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत असतील. विशेषतः भुदरगड, पन्हाळा आणि करवीर यांसारख्या डोंगरगांवच्या भागात मानवी हस्तक्षेपामुळे होणारी दरड कोसळण्याची भीती लक्षात घेता, भूगर्भ तज्ज्ञांच्या अभ्यासानुसार उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या, ज्यावर जिल्हा परिषदेमार्फत जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे.

नदीपात्रातील केंदाळ, गाळ आणि वाढते प्रदूषण यांमुळे पुराची तीव्रता वाढत असल्याचा मुद्दा खासदार धैर्यशील माने यांनी मांडला. आमदार राहुल आवाडे यांनी इचलकरंजीच्या पाणीपुरवठ्यावरील ताण आणि केंदाळ काढण्यासाठी कायमस्वरूपी निधीची मागणी केली, तर आमदार शिवाजीराव पाटील यांनी गाळ काढण्याच्या प्रस्तावाबाबत नाराजी व्यक्त केली. यावर पालकमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले की, नदी खोलीकरण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत पुढील आठवड्यात मुंबईत बैठक घेऊन प्रलंबित प्रस्तावांचा पाठपुरावा केला जाईल. तसेच, १५ दिवसांत नद्यांच्या बंधाऱ्यांचा निचरा करण्याचे आदेश जलसंपदा विभागाला देण्यात आले आहेत.

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील पूरस्थिती ही प्रामुख्याने अलमट्टी आणि हिप्परगी धरणांतील पाणी विसर्गावर अवलंबून असते. यावर्षीच्या पावसाळ्यात पाण्याचे चोख नियोजन करण्यासाठी आणि विसर्गाचा समन्वय साधण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटक दरम्यान आंतरराज्य समन्वय बैठक तातडीने घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी जिल्हाधिकारी स्तरावरील आंतरराज्य बैठक पूरस्थिती विषयक तातडीने घेणे आवश्यक असल्याचे सांगत यावेळी योग्य नियोजन करण्याच्या सूचना केल्या. अलमट्टीच्या बॅकवॉटरचा फटका बसू नये यासाठी 'स्ट्रॉंग मॉनिटरिंग' प्रणाली राबवली जाणार आहे. याशिवाय, कृषी विभागाने वेळेत पंचनामे करावेत आणि आरोग्य विभागाने आपत्कालीन औषधसाठा तयार ठेवावा, अशा सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या.

'देश प्रथम! मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद; पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी रद्द केला लंडन-पॅरिस दौरा'



मुंबई : देशातील सध्याची कठीण आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विदेशी चलनाची बचत करण्यासाठी अनावश्यक परदेश दौरे आणि खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांच्या या संदेशाला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्राचे पर्यटन,खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याणमंत्री, पालकमंत्री, सातारा जिल्हा शंभूराज देसाई यांनी आपल्या कुटुंबासोबत नियोजित असलेली युरोप दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

माहितीनुसार, सुमारे तीन महिन्यांपूर्वी ही कौटुंबिक परदेश सहल ठरविण्यात आली होती. या दौऱ्यात लंडन, पॅरिस आणि ॲम्स्टरडॅम या प्रमुख शहरांचा समावेश होता. कुटुंबासोबत सुट्टी आणि पर्यटनासाठी हा दौरा आखण्यात आला होता.

मात्र, देशहिताला प्राधान्य देत आणि विदेशी चलन बचतीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचावा या उद्देशाने देसाई यांनी हा दौरा रद्द केल्याची माहिती समोर आली आहे.

राजकीय वर्तुळात या निर्णयाचे स्वागत होत असून 'देश प्रथम' या भूमिकेचे हे उदाहरण मानले जात आहे.

वैयक्तिक आनंद आणि सुट्टीपेक्षा राष्ट्रहित अधिक महत्त्वाचे असल्याचा संदेश या निर्णयातून देण्यात आल्याची चर्चा आहे.

देशहिताला

प्राधान्य, जबाबदारीची जाणीव आणि साधेपणाचा संदेश देत शंभूराज देसाई यांनी माननीय पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला, त्यामुळे त्यांच्या या निर्णयाचे राजकीय वर्तुळात कौतुक होत आहे.

सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा साकोरे राज्यस्तरीय उद्योग उत्कर्ष पुरस्काराने सन्मानित



प्रतिनिधी/कैलास गायकवाड

लोणी : केंदूर ता. शिरूर येथील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा विश्वास साकोरे यांना नुकताच राज्यस्तरीय समाज उत्कर्ष २५२६ पुरस्काराने संस्थेच्या सचिव मनीषाताई घागरे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना उद्योग उत्कर्ष सामाजिक संस्था. ता.बई, जिल्हा सातारा येथील संस्थेच्या वतीने देण्यात आला.

?संत श्रेष्ठ कान्होराज महाराज यांच्या पावन भूमीला वंदन करून आपल्या समाजकार्याचा श्रीगणेशा करणाऱ्या सौ. सुवर्णा विश्वास साकोरे या महिला सक्षमीकरणाच्या खऱ्या शिल्पकार ठरल्या आहेत. २०१९ मध्ये त्यांनी 'कम्युनिटी रिसर्च पर्सन' (सी आर पी) म्हणून कामाला सुरवात केली आणि त्यांच्या कष्टाचे फळ म्हणून आज त्या 'डिस्ट्रिक्ट रिसर्च पर्सन' (डी आर पी) म्हणून कार्यरत आहेत. सुरुवातीच्या काळात गावात शासकीय उमेद अभियानाचे गट तयार करताना त्यांना प्रचंड विरोधाला आणि त्रासाला सामोरे जावे लागले, मात्र त्यांनी हार न मानता जिद्दीने महिलांचे समूह संघटित केले आणि आज या गटांना सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंतचे बँक कर्ज मिळवून देऊन त्यांनी महिलांच्या प्रगतीची दारे उघडली आहेत.

?केवळ आर्थिक साहाय्यच नव्हे, तर त्यांनी सामाजिक आणि कृषी क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. यशोदा संस्थेच्या माध्यमातून ओझाचे खोलीकरण व रुंदीकरण असो किंवा आय.ऐ.एच. व्ही. संस्थेमार्फत ग्रामीण नागरिकांना दिलेले डिजिटल मोबाईल प्रशिक्षण असो, सुवर्णा ताईंनी नेहमीच काळाची पावले ओळखून काम केले. 'वॉटरफॉल पॉपल' या संस्थेच्या सहकार्याने त्यांनी शेतकरी महिलांना ठिबक, स्पिंकलर आणि कांदा कटिंग मशीन यांसारखी अवजारे उपलब्ध करून दिली, तर रोटरी क्लबच्या माध्यमातून शिलाई मशीन मिळवून देऊन अनेक कुटुंबांना स्वावलंबी बनवले.७० ते ८० महिलांना आरी वर्कचे मोफत प्रशिक्षण देण्यासोबतच अगरबत्ती, साबण, मसाले आणि पार्लर यांसारख्या विविध गृहउद्योगांचे कौशल्य त्यांनी महिलांना प्रदान केले आहे. सध्या 'आर सेटी' संस्थेच्या माध्यमातून त्या ३५ महिलांना शेळीपालनाचे प्रशिक्षण देत असून, अशा प्रकारे मोफत प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून त्यांनी समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे.

आ.च.विद्यालय,मलकापूरचे १० बोर्ड परीक्षेत दैदिप्यमान यश

विद्यालयाचा ९५.२९ टक्के निकाल



मलकापूर - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेत श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या आ.च.विद्यालय व आदर्श ज्युनिअर कॉलेज मलकापूरने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयातील कु. वैष्णवी राजेंद्र पांढरपट्टे हिने ९७.२० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक कु. वैष्णवी राहुल सावंत हिने ९६.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, शिवराज शरद शेवाळे याने ९६.०० टक्के गुणांसह तृतीय, अनुज प्रकाश पाटील ९१.२० टक्के गुणांसह चतुर्थ, तर श्रीराज महेश तनंगे ८८.२० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक पटकविला.

विद्यालयाचा एकूण निकाल ९५.२९ टक्के लागला असून विशेष प्राविण्यासह २०, प्रथम श्रेणीत ६३, द्वितीय श्रेणीत ५९ व पास श्रेणीत १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शासकीय शिष्यवृत्ती, विविध स्पर्धा परीक्षा तसेच शालेय क्रीडा स्पर्धांमध्येही विद्यालय सातत्याने उल्लेखनीय यश मिळवत आहे. त्याशिवाय इयत्ता पाचवी ते दहावी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या प्रवेशासाठी पालकांची पहिली पसंती विद्यालयास मिळत आहे.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव रोहीमित्र अशोकराव थोरात, उपाध्यक्ष भास्करराव पाटील, मार्गदर्शक संचालिका डॉ. सौ.स्वाती थोरात, संचालक मंडळ, मुख्याध्यापक श्री.ए.वी.थोरात, उपमुख्याध्यापक श्री.एम.पी.फराळे, पर्यवेक्षक श्री.जे.बी.पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सैन्य दलात उत्तुंग भरारी.! संगमवाडीच्या ऋषिकेश घुगे यांची अधिकारीपदी निवड

प्रतिनिधी /संतोष कांबळे

कंधार । : संगमवाडी नगरीचे सुपुत्र ऋषिकेश विठ्ठल घुगे यांनी आपल्या मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सन २०२१ मध्ये त्यांनी इंडियन आर्मीमध्ये भरती होऊन आपल्या देशसेवेची सुरुवात केली. कमी वयात सैन्यात दाखल होणे हीच मोठी गोष्ट असताना, त्यांनी त्यावर समाधान न मानता सतत प्रगती करण्याचा ध्यास घेतला. आणि सैन्य दलात उत्तुंग भरारी घेत अधिकारी पदी संपादन केले आहे.

सेवेत असतानाच त्यांनी आपल्या खात्याअंतर्गत जेसीओ (व्हरन्दे एन्लस्मेन्ट्स ऑफिसर्स) पदासाठी होणारी परीक्षा दिली. ही परीक्षा अत्यंत कठीण मानली जाते, कारण त्यासाठी शारीरिक तसेच बौद्धिक क्षमतेची कसोटी लागते. मात्र ऋषिकेश यांनी आपल्या प्रामाणिक प्रयत्नांनी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाने ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. नुकताच लागलेल्या निकालामध्ये त्यांची अधिकारी म्हणून निवड झाली असून, ही संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब आहे.

त्यांचे हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे तर संपूर्ण संगमवाडी गावासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे गावातील युवकांना नवीन दिशा आणि प्रेरणा मिळणार आहे. कमी वयात मोठे स्वप्न पाहून ते पूर्ण करण्याची जिद्द त्यांनी दाखवून दिली आहे.



ऋषिकेश घुगे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांनी यापुढेही अशीच प्रगती करत राहावी आणि देशसेवेत अधिक उंची गाठावी, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित दहा सदस्यांचा १४ मे रोजी शपथविधी

सभापती प्रा. राम शिंदे सदस्यत्वाची शपथ देणार, मुख्यमंत्र्यांसह अनेक नेते उपस्थित राहणार

मुंबई : महाराष्ट्र विधानपरिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारे द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेले नऊ सदस्य आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या एक सदस्या अशा दहा नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी गुरुवार, १४ मे, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे होणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे या दहा सदस्यांना सदस्यत्वाची शपथ देतील.

१) डॉ. नीलम गोऱ्हे
२) ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू
३) अंबादास एकनाथराव दानवे
४) डॉ. प्रज्ञा राजीव सातव
५) प्रमोद शांताराम जठार
६) झीशान झिआउद्दीन सिद्दीकी
७) माधवी संजय नाईक
८) सुनिल विनायक कर्जतकर
९) विवेक विपिनदादा कोल्हे
१०) संजय नथुजी भेंडे

या नवनिर्वाचित सदस्यांना सभापती शपथ देतील. या शपथविधी समारंभास विधानसभेचे अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभेचे उपाध्यक्ष. अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांना निमंत्रित करण्यात आले असून या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असेल. विधानपरिषदेच्या सदस्यांनाही शपथविधी समारंभासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. विधानपरिषदेच्या विद्यमान उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे सलग पाचव्यांदा सदस्यत्वाची शपथ घेतील.

फाउंटन येथील परिवहन आयुक्त कार्यालय आता वांद्रे (पूर्व) येथे स्थलांतरित

मुंबई : मोटार वाहन विभागाचे मुख्यालय असलेले परिवहन आयुक्त कार्यालय फाउंटन येथून प्रशासकीय इमारत, ४ था मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. वापूर्ती परिवहन आयुक्त कार्यालय हे ५ वा मजला, टेलिकॉम बिल्डिंग क्रमांक २, महात्मा गांधी रोड, फाउंटन, मुंबई – ४०० ००१ येथे कार्यरत होते. आता हे कार्यालय प्रशासकीय इमारत, ४ था मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ येथे स्थलांतरित झाले आहे.

या नवीन कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२२-२०८६३४०६ असून ई-मेल आयडी dycommr.inspect@gmail.com असा आहे. सर्व नागरिकांनी कार्यालयाच्या पत्त्यात झालेल्या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक परिवहन आयुक्त (निरीक्षण) कैलास कोठावदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर कारवाई करा : मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई : राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ?प सेवा तत्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर क्राईम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर परिवहन आयुक्त यांनी देखील यासंदर्भात सायबर क्राईम विभागाकडे पत्र पाठविले आहे.

मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ?पाच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः

सायबर क्राईम विभागाला पत्र

रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.

या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या ?प्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे.

सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी अप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

आज श्रीक्षेत्र उमरज येथे योग शिबिर व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी/ संतोष कांबळे

कंधार । : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, सहाय्यक व्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, नांदेड व श्री संत नामदेव महाराज संस्थान, उमरज, ता. कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१३ ते १९ मे रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ८ या वळेत योग शिबिर व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

योगगुरु निळकंठ मोरे हे योगाचे प्रशिक्षण देणार आहेत. तसेच दि.१६ मे रोजी आरोग्य तपासणी शिबिर पार पडणार आहे. या शिबिरामध्ये कंधार मधील तज्ञ डॉक्टर तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरात रक्तदाब तपासणी, रक्तातील साखर, मधुमेह व्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, नांदेड व श्री संत नामदेव महाराज संस्थान, उमरज, ता. कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१३ ते १९ मे रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ८ या वळेत योग शिबिर व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तपासणी, इसीजी, औषधे, अस्थमा दमा तपासणी, आहारावदल मार्गदर्शन, कान, नाक, घसा तपासणी, डोळे तपासणी करण्यात येणार आहे.

नागरिकांनी या शिबिराचा आवश्यक लाभघ्यावा, असे आवाहन समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगीरे व श्री संत नामदेव महाराज संस्थानचे मठाधिपती, महंत एकनाथ महाराज यांनी केले आहे.—

हिंगणघाटचे टाका ग्राउंड अवैध झोपडपट्टीच्या विळख्यात

अतिक्रमण हटविण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव



हिंगणघाट : हिंगणघाट शहराचे मध्यभागी असलेले टाका ग्राउंड ला अतिक्रमनाने वीळखा घातला असून राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे या मैदानाची आता दुरावस्था झाली आहे. शहराच्या मध्यभागी असलेले या मैदानावर फुटबॉल ,क्रिकेट ,कबड्डी आदी स्पर्धा चे मोठ्या प्रमाणावर आयोजन होत असते. किंबहुना राजकीय नेत्यांच्या सभा सुद्धा या मैदानावर पार पडल्या जातात. नियमित सरावाकरीता अनेक खेळाडू या मैदानात घाम गाळतात. या मैदानावर तत्कालीन नगराध्यक्ष गिरधर राठी यांचे कार्यकाळात क्रिकेटच्या रणजी सामन्याचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. परंतु गेल्या काही वर्षात या मैदानावर आता चोहोबाजूंनी झोपड्याचे अतिक्रमण झाले असून काहींनी तर पक्की घरी उभारली आहेत. या झोपडपट्टी मध्ये प्रामुख्याने बाहेर गावातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण थाटले असून अवैध धंद्याचे केंद्र बनले आहे. परंतु याकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. मोठ्या संख्येने झोपडपट्टया उभारल्या असल्याने त्याचे सांडपाणी थेट मैदानात येत असून सराव करणाऱ्या खेळाडूंना त्रास सहन करावा लागतो. येथील नागरिक घरातील कचरा सुद्धा मैदानावर फेकतात. झोपडपट्टीतील नागरीक याच मैदानावर शौचात जात असल्याने दुर्गंध युक्त वातावरण असते. त्यामुळे या मैदानाची परिस्थिती चिंताजनक झाली आहे. परंतु लोकप्रतिनिधींना त्याच्याशी काही घेणे देणे असल्याची दिसत नाही. लष्कराचे मालकीचे मैदान असल्याचे सांगून आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु नगरपालिका प्रशासनाच्या देखरेखी खाली असलेल्या मैदानाची जबाबदारी नगरपालिका प्रशासनावर आहे. परंतु ते सुद्धा जबाबदारी झटकताना दिसून येतात. नवनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर नयना तुळसकर यांनी पुढाकार घेऊन या मैदानावरील संपूर्ण अतिक्रमण काढून टाकण्याची कारवाई करावी व शहरातील एकमेव उरलेल्या मैदानाला वाचवावे. अशी मागणी क्रीडा प्रेमी व शहरातील नागरिक करीत आहे. शहर प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त हिंदी विद्यापीठात कुलगुरूंनी केले ध्वजारोहण

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यापीठाच्या वाचस्पती भवनाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी ध्वजारोहण केले. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी कल्याण व संस्कृती विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार, कुलसचिव कादर नवाज खान, वित्त अधिकारी पी. सरदार सिंह उपस्थित होते. कार्यक्रमात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताने झाली. डॉ. तेजस्वी एच. आर. आणि शिल्पा यांनी राष्ट्रगीत सादर केले. त्यानंतर कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी राष्ट्रध्वज फडकावला. विद्यापीठाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी बँडवर राष्ट्रगान सादर केले. यानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले.

याप्रसंगी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी उपस्थित सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, जी मराठी भाषा, संस्कृती आणि ओळख जपण्याचे प्रतीक आहे. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी महाराष्ट्र राज्य आणि देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घेण्याचा तसेच संविधानातील मूल्ये आपल्या जीवनात अंगीकारण्याचा तसेच देशाची एकता, अखंडता व प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला.

आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी वाढणार - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



मुंबई : राज्यातील आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आदिवासी अध्यासन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन व संशोधनाला या निर्णयांमुळे गती मिळणार असून, त्याचा थेट लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना होणार आहे. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या संधी वाढणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी अध्यासन केंद्रांना निधी उपलब्ध करण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, मुंबई, जळगाव, नांदेड, अमरावती, गडचिरोली विद्यापीठाचे कुलगुरू उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, जळगाव, नांदेड व मुंबई विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र कार्यरत असून अमरावती व गडचिरोली विद्यापीठात नव्याने आदिवासी अध्यासन केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. या विद्यापीठाला आदिवासी अध्ययन केंद्रासाठी ३ कोटी रुपयांचा निधी आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निधीतून केंद्रांची उभारणी, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

आदिवासी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि

विद्यापीठांत आदिवासी संशोधनाला गती

आर्थिक विकासासाठी संशोधनाधारित उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींची समृद्ध लोकसंस्कृती, भाषा आणि परंपरा जतन करणे तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संशोधन करणे हा या केंद्रांचा मुख्य उद्देश आहे. यामार्फत आदिवासी समाजाचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शैक्षणिक आणि संशोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, आदिवासी अध्यासन केंद्राच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या पारंपरिक ज्ञान, संस्कृती आणि जीवनशैलीचा अभ्यास होऊन त्याचे जतन करण्यास मदत होणार आहे. तसेच, शिक्षण आणि संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी युवकांना नवीन संधी उपलब्ध होऊन त्यांचा सर्वांगीण विकास साध्य होण्यास मदत होईल. आदिवासी विद्यार्थ्यांचा उच्च व तंत्र शिक्षणातील सहभाग वाढविणे आणि त्यांना रोजगारक्षम बनविणे हेही या केंद्रांचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.

चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर बैठक

एका महिन्यात अंमलबजावणी अहवाल सादर करा : विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे



मुंबई : मुंबईतील गोरेगाव येथील चित्रनगरीसह राज्यातील चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार आणि ज्युनिअर कलाकारांच्या विविध प्रश्नांबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. कंत्राटी फिल्म कामगार आणि ज्युनियर कलाकारांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संयुक्त समितीची बैठक घेण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच, करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सविस्तर अंमलबजावणी अहवाल एका महिन्याच्या आत सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

हिवाळी अधिवेशन २०२५ दरम्यान ९ डिसेंबर २०२५ रोजी आमदार सुनील प्रभू यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार व ज्युनिअर कलाकारांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत कामाचे निश्चित तास, सकस भोजनाची व्यवस्था, वेतन थेट निर्मात्यांकडून देणे, चित्रीकरण स्थळी स्वच्छता राखणे, महिला कलाकारांसाठी कपडे बदलण्याची स्वतंत्र सुविधा तसेच रात्रीच्या चित्रीकरणानंतर सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाच्या १४ फेब्रुवारी २०२४ रोजी जारी करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणालीची (एसओपी) प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबतही बैठकीत निर्देश देण्यात आले. चित्रनगरी प्रशासनाने संबंधित निर्मिती संस्थांना यापूर्वी सूचना देऊनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याबाबत यावेळी चिंता व्यक्त करण्यात आली. राज्यातील सुमारे ५ लाख कंत्राटी फिल्म कामगार व ज्युनिअर कलाकारांच्या हितासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

बैठकीस आमदार सुनील प्रभू, फिल्म सिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, फिल्मसिटीचे व्यवस्थापकीय सहसंचालक प्रशांत साजणीकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपव्यवस्थापक महेश वाव्हळ, कामगार विभागाचे सह आयुक्त संकेत कानडे तसेच विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

सौ. चारूताई लोही (गावणेर) यांचे निधन



आष्टी (शहीद) :- आष्टी तालुक्यातील लहान आर्वी गावातील प्रतिष्ठीत नागरीक वसंतराव गावणेर यांना पुत्रीशोक झाला असून त्यांची कन्या सौ. चारूताई उमेशराव लोही (वय ४१ वर्षे)रा. काटोल यांचे ब्रेन परालेसिस मुळे एकाएकी दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे सपुर्ण लहान आर्वी गावात हळहळ व्यक्त होत आहे. सौ. चारूताई लोही या मनमिळाऊ, प्रेमळ व कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांनी आपल्या वागणुकीने नातेवाईक व परिचितांच्या मनात आपुलकीचे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने लहान आर्वी येथील गावणेर कुटुंबावर आणि काटोल येथील लोही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

त्यांच्या पश्चात पती उमेशराव लोही आणि एकुलती एक मुलगी कु. खुशी लोही तसेच आई-वडील व तीन बहिणी असा मोठा आप्त परिवार आहे. सौ. चारूताई लोही यांच्या निधनाची बातमी कळताच लहान आर्वी गावात शोककळा पसरली.त्याच्यावर काटोल येथील मोक्षधामात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी त्याना सामुहीक भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आर्यन नितीन वरकड अभ्यासात व खेळात अव्वल



प्रतिनिधी/ शकील मनियार

पुणे : एसएससी बोर्ड परीक्षा २०२६ चा निकाल ८ मे रोजी जाहीर झाला.महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय राजगुरुनगर ता खेडचा विद्यार्थी आर्यन नितीन वरकड याने ४९१९५०० ९८.२०३ गुण, मिळवत विद्यालयात द्वितीय क्रमांक मिळविला.अभ्यासात जिद्द आणि. चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येते हे आर्यन याने दाखवून दिले.आर्यन वडील नितीन वरकड हे महात्मा गांधी विद्यालयात क्रीडा शिक्षक म्हूणन काम पहात असून ते खेड तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष आहेत.आर्यन इ.७ वी पासून वेटलिफ्टिंग,थाळीफेक, गोळफेक,बेसबॉल अशा विविध खेळात सहभागी झाला आणि वेटलिफ्टिंग आणि बेसबॉल या खेळात राष्ट्रीय पातळीवर पदक विजेता खेळाडू ठरला त्याला या खेळासाठी त्याचे वडील नितीन वरकड यांचे मार्गदर्शन लाभले या शिवाय दिलीपकुमार गुप्ता सर यांच्या सारखे वेटलिफ्टिंगचे कोच लाभले.अभ्यासमध्ये महात्मा गांधी विद्यालयातील सर्व अध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले ज्ञानगंगा कोचिंग क्लासेसचे के.के.बोंबले आणि आबाजी पोखरकर यांनी आर्यन यांच्या अभ्यासावर खूप मेहनत घेतली म्हणून आर्यन हे यश संपादन करू शकला.आई-वडिलांची सतत प्रेरणा व आशीर्वाद,गुरुजनांचे मार्गदर्शन ,आई प्राथमिक शिक्षिका माया वरकड यांची खंबीर साथ यामुळेच मला हे यश मिळाल्याचे आर्यन याने सांगितले. पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना शिक्षक लोकशाही आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा.जितेंद्रकुमार थिटे,खेड तालुका क्रीडा संघटनेचे माजी अध्यक्ष रामदास रेटवडे,शिरूर तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष शरद दुर्गे, माझी माती माझी माणसं प्रतिष्ठानच्या अध्यक्षा जिजाबाई थिटे व सहकाऱ्यांनी आर्यनचे अभिनंदन केले

उष्णतेसाठी व्याप

अमृत २.० अभियानांतर्गत लोककलेच्या माध्यमातून जनजागृती – जलसंवर्धन, स्वच्छता आणि हरित शहरांचा संदेश



हिंगणघाट : महाराष्ट्र नगरविकास विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या अमृत २.० अभियानाच्या अंतर्गत नगरपरिषद हिंगणघाट येथे उपाध्यक्ष निलेश ठोंबरे पाणीपुरवठा सभापती रवीला आखाडे ,वैशाली काळे बालकल्याण सभापती ,राजू कामडी नगरसेवक व प्रशासकीय अधिकारी. न.प. कर्मचारीयांना माहिती व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास उपस्थित राहून सभापती व नगरपरिषद कर्मचारी त्यांच्यासोबत संवाद साधला. 'चला पाण्याला पुनर्जीवन देऊया, अमृत २.० सोबत जलसुरक्षित शहरे घडवूया' या संदेशाखाली लोककला, शायरी आणि सांस्कृतिक सादरीकरणांच्या माध्यमातून जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि शाश्वत नागरी विकासाचे महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले.

अमृत २.० अभियानांतर्गत १००३ पाणी पुरवठा जोडणी, जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन, हरित क्षेत्रांचा विकास, सांडपाणी प्रक्रिया आणि मलनिःस्सारण व्यवस्थेचे सुदृढीकरण यांसारख्या महत्त्वपूर्ण उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. आधुनिक आणि पर्यावरणपूरक शहरनिर्मितीसाठी नागरिकांचा सहभाग किती आवश्यक आहे, हेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

'पाणी वाचवा, पर्यावरण जपा आणि स्वच्छतेला जीवनशैली बनवा' हा संदेश देण्यात आला. आजची युवा पिढी जागरूक झाली तर उद्याची शहरे अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि विकसित बनतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

लोककलेच्या प्रभावी माध्यमातून सामाजिक संदेश जनतेपर्यंत पोहोचविणारे असे उपक्रम समाजजागृतीसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असून, जनसहभाग, जागरूकता आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावरच स्वच्छ, हरित आणि जलसुरक्षित हिंगणघाट घडविणे शक्य आहे, ही भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

बाल सुसंकार शिबिरा मुळे प्रती पंढरी दुमदुमली

वारकरी बाल सुसंस्कार शिबिराचा शुक्रवारी समारोप,काल्याचे किर्तन व महाप्रसाद



प्रतिनिधी/प्रशांत झाडे

सेलू : आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात लहान मुलांच्या हातातील खेळणी नाहिसी झाली असून त्या ऐवजी पालकांनी त्याचे हातात दिलेला मोबाईल पाहता जूने दिवस विसरले असल्याने बालकावर करावयाचे संस्कार दूर होताना दिसत असून त्या बालकांना सुसंस्कार मिळावे यासाठी शिबिराचे आयोजन केले जाते.

यासाठी सलग मागील वर्षा पासून घोराड येथील विठ्ठल रुख्माई देवस्थान मध्ये सुरू असलेल्या विनामूल्य वारकरी बाल सुसंस्कार शिबिराचा शुक्रवार दिनांक १५ रोजी समारोप होत आहे. मात्र या शिबिरा मुळे पुन्हा एकदा प्रती पंढरी दुमदुमली.

शिबिराची सुरुवात दिनांक ४ पासून झाली असून या शिबिरात १४० हून अधिक बालकांनी सहभाग घेतला. आजही उन्हाळी शिबिर घेतले जातात पण प्रती पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र घोराड येथे विनामूल्य शिबिराचे आयोजन होत असते , यवतमाळ, हिंगणा, तळेगाव पवनार, वर्धा, येथील बालकांनी याशिबिरात सहभाग घेतला, बालकांनी हरिपाठ, हनुमान चालीसा, विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी ओव्या, मृदुंग वादन, पखवाज वादन , लाठी काठी, आदी धार्मिक वारकरी विषयाचे शिक्षण घेत आहे. या शिबिरात ३० मुलींनी सहभाग नोंदविला हे या शिबिराचे वैशिष्टे आहे.

संतोष महाराज जाधव, गणेश महाराज येळुंबे, गणेश महाराज भागवत, यश महाराज गोमासे , विलास महाराज घुमरे, नाना महाराज वालेकर आदींनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले.शिबिराची सांगता शुक्रवारी होणार असून सकाळी १० वाजता मयुर महाराज दरणे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

यानंतर शिबिराला सहकार्य करणाऱ्या दान दात्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. महाप्रसादाने या शिबिराची सांगता होणार आहे या शिबिरासाठी विठ्ठल रुख्माई देवस्थान ट्रस्ट ने विनामूल्य सभागृह व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

शिबिराच्या यशस्वतेसाठी डॉ. सुरेंद्र भुते, विजय माहुरे, परसराम गोमासे, हरिभाऊ महाजन, दिलीप पोहाणे, सौरभ पोहाणे, शुभम मुडे , पुरुषोत्तम गुजरकर, आदींनी प्रयत्न केले.

मोबाईल पासून दूर राहून ११ दिवस विद्यार्थ्यांना भक्तीरंग , भक्तिरस,अभंग, हरिपाठ, साधकांना कळला, सात वर्षीय बालकापासून तर शिबिरातील असंख्य विद्यार्थी तबला वादन, पखवाज याचे काही का होईना पण शिक्षण मिळाले,

शिबिरामुळे विद्यार्थ्यांना आध्यात्मिक, वारकरी संप्रदाय, कळायला लागला हे तेवढेच खरे. या शिबिरा मुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले आहे.

शिबिर विनामूल्य असल्यामुळे ११ दिवस असणाऱ्या दोन वेळाच्या जेवणाची पंगत , दोन वेळ नाष्टा, यासाठी अन्नदात्यांनी आपला सहकार्याचा हात पुढे करीत सढळ हाताने मदत केली.

शिबिराचा समारोप साधक, पालक, व दान दात्यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.११ दिवसाचे असणाऱ्या शिबिराला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या.

नूतन कन्या विद्यालय तळेगावचा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



तळेगाव : फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस एस सी बोर्ड परीक्षेमध्ये नूतन कन्या विद्यालय तळेगावचा निकाल ८९३लागला असून त्यामध्ये प्रथम क्रमांक कु.अनुष्का राजू जाधव, द्वितीय क्रमांक कु.गुंजन संजय भुजाडे, तृतीय क्रमांक कु.वैष्णवी गजानन येसनसुरे यांचा लागला.एस एस सी परीक्षेला २७ विद्यार्थ्यांपैकी २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थेचे संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट निकालाकरिता व उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा देण्यात आल्या

नगरपरिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या जलवाहिन्या चे काम करताना खेरडा गावाला जाणाऱ्या रस्त्याचे विद्रूपीकरण

वर्धा : सुकळी बाई येथील गट ग्रामपंचायत असलेल्या खेरडा या गावाला येळाकेळी येथून रस्ता जातो मागील दोन वर्षे आधी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत खेरडा गावाला रस्ता निर्मिती झाला. खेरडा व येळाकेळी लगत गौणखनिज ची पहाडी आहे व तिथून गौणखनिज ची वाहतूक केली जाते. त्याआधी सदर रस्त्यावर खदानीचे ओव्हरलोड ट्रक धावत होते त्यामुळे त्या रस्त्याचे खूप खस्ताहाल झाले होते. त्यानंतर खूप प्रतीक्षेनंतर गावकऱ्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ता बांधकाम करुन मिळाला. व सदर रस्ता अबाधित राहावा याकरिता ग्रामपंचायत सुकळी बाई व खेरडा येथील गावकरी यांच्यावतीने खदानीच्या ओव्हरलोड ट्रक साठी सदर रस्ता बंद करण्यात आला. कारण रस्ता हा चांगला राहिला पाहिजे याकरिता हा खटाटोप केला. परंतु अलीकडे येळाकेळीच्या नदीवरून पाणीपुरवठा होत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वर्धा व नगरपरिषद वर्धा यांचे पंप हाऊस असून जलवाहिन्यांद्वारे वर्धेला व वर्धेच्या बाजूच्या १४ गावांना पाणीपुरवठा केला जातो. त्यामध्ये त्यांचे जलवाहिन्यांचे मेंटेनन्स चे कामे किंवा नवीन जलवाहिन्या टाकण्याकरिता वारंवार



कुठलीही पूर्वपरवानगी न घेता रस्ते फोडले जातात व नंतर त्या स्थितीतच थातुर मातुर बुजून दिले जातात. परंतु त्याचे डांबरीकरण वगैरे केले जात नाही. असे अनेक ठिकाणी रस्त्यावर होत असल्यामुळे पुन्हा रस्ता खराब झालेला आहे त्यामुळे गावकऱ्यांनी संबंधित नवीन जलवाहीनीच्या कामाला थांबवून न्याय मागितला आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासन यांनी त्या रस्त्याची दुरुस्ती करून द्यावी. अन्यथा आम्ही कोणतेही काम करू देणार नाही असा इशारा खेरडा येथील गावकऱ्यांनी दिला आहे.

अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे



मुंबई : सामान्य प्रशासन विभागाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अधिसूचनेनुसार अरुण किशोर डोंगरे यांची अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी डोंगरे यांना पद व गोपनियतेची शपथ दिली.

नवीन प्रशासन भवन, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात झालेल्या शपथग्रहण सोहळ्यामध्ये माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली.

अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल नवनियुक्त आयुक्त अरुण डोंगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.

या शपथविधी सोहळ्याला विधानसभा सदस्य करण देवतळे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, कोकण विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त सुधाकर तेलंग तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गौळ येथे संत? मुक्ताई तिरोधान मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिन सोहळा.!



गौळ : देवळी तालुक्यातील गौळ येथील संत बाबाराव महाराज खराबे संस्थानात १२ मे रोजी वैशाख वद्य दशमी आदिशक्ती संत? मुक्ताई तिरोधान सोहळा,व भगवान पंढरीश परमात्मा श्री विठ्ठल रुक्मिणी माऊली ज्ञानोबाराय जगतगुरु तुकोबाराय,सदगुरु नारायण नारायण महाराज,सदगुरु दौलत महाराज यांच्या मुर्ती स्थापन झाला तो मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिन सोहळा संपन्न झाला.

सकाळी कलश स्थापना होऊन सर्व मुर्तींचा अभिषेक करण्यांत आला,यावेळी ह.भ.प.केशव महाराज चवरे यांचा प्रवचनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी सर्व यजमान मंडळी प्रफुल गावंडे,श्रीमती सुमनबाई बोंडे,सौ.छायाताई शेळके,यांच्या हस्ते पुजा अभिषेक संपन्न झाला ब्रह्मवृंद म्हणुन ह.भ.प.गणेश महाराज आकोटकर व परीसरातील भक्तमंडळी मोठ्या संखेने उपस्थीत होती वरील सर्व कार्यक्रम विणेकरी संतसेवक रविंद्रजी महाराज विलायतकर यांच्या मार्गदर्शनात पार पडला,या कार्यक्रमाचे आयोजन,सद्गुरु खराबे महाराज सेवाश्रम ट्रस्ट च्या वतीने करण्यांत आले होते.

लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा



मुंबई : पुण्यातील महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीच्या प्रलंबित प्रश्नांबाबत विधानभवनात आढावा घेण्यात आला. पुनर्वसनाची प्रक्रिया राबविताना स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेण्यात यावे, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समिती, पुणे यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक पार पडली. या बैठकीत रहिवाशांच्या पुनर्वसन, मोबदला, फ्लॅट वाटप आणि सर्वेक्षणासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इतर महानगरपालिकांमध्ये देण्यात आलेल्या मोबदल्याचा अभ्यास करण्यात यावा, असे निर्देश दिले. महानगरपालिका किती जागा सामावून घेऊ शकते याचाही अभ्यास करण्यात यावा. ज्या महानगरपालिकांमध्ये जितका मोबदला देण्यात आला आहे त्याचाही अभ्यास करण्यात येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना १५ तारखेला विशेष बैठक घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. संबंधित रहिवाशांसमोर धोरण मांडण्यात यावे, त्यांना आवाहन करण्यात यावे आणि त्यांचा विश्वास संपादन करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

पुनर्वसन प्रक्रियेत पारदर्शकता आणि लोकाभिमुख भूमिका महत्त्वाची असून ज्यांना रोख रक्कम हवी आहे त्यांना रोख मोबदला आणि ज्यांना फ्लॅट हवा आहे त्यांना फ्लॅट देण्याचा पर्याय विचारात घेण्यात यावा. सर्व स्मारकांचे सर्वेक्षण करून संपूर्ण तपशील लोकांसमोर मांडण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. कृती समितीच्या सदस्यांना स्थायी समिती सदस्यांकडे निवेदन सादर करून आपले मत अधिकृतपणे नोंदविण्याचाही सल्ला डॉ. गोऱ्हे यांनी दिला.

त्यामुळे किती लोक घर स्वीकारण्यास तयार आहेत आणि किती लोकांना रोख रक्कम हवी आहे याची स्पष्ट माहिती उपलब्ध होईल. बैठकीपूर्वी लोकांचे मत जाणून घेतले तर ते उपयोगी ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

बैठकीत पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त सपकाळ यांनी सर्व संबंधितांची स्वतंत्र बैठक घेऊन वन-टू-वन संवाद साधावा. त्यानंतर लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात यावी, असे निर्देश डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.तसेच महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

घोराडात वारकरीच्या निनादात संस्कारीत होत आहेत बालक !



सेलू : मोबाईलच्या आहारी गेलेल्या आजच्या पिढीला भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेची ओळख करून देण्यासाठी सेलू तालुक्यातील घोराड येथे ११ दिवसीय विनामूल्य वारकरी बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तब्बल १४० हून अधिक बालकांनी सहभाग घेतला असून हरिपाठ, अभंग, ज्ञानेश्वरी ओव्या, मृदुंग-पखवाज वादन, लाठी-काठी आदींचे प्रशिक्षण दिले जात आहे.

यवतमाळ, हिंगणा, तळेगाव पवनार आणि वर्धा येथील बालकांनी या शिबिरात सहभाग घेतला आहे. पांढरे शुभ्र धोतर, टोपी, कपाळावर नामटिळा आणि हातात टाळ घेऊन 'जय जय रामकृष्ण हरी' च्या गजरात बालवारकरी भक्तिरंगात रंगून जात आहेत.

संतोष महाराज जाधव, गणेश महाराज येळुंबे, गणेश महाराज भागवत, यश महाराज गोमासे, विलास महाराज घुमरे आणि नाना महाराज वालेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिराची सांगता १५ मे रोजी मयुर महाराज दरणे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून दानदात्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, या ११ दिवसांच्या शिबिरात सहभागी बालकांनी मोबाईलपासून पूर्णपणे दूर राहून भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचा आनंद घेतला. शिबिरासाठी विठ्ठल रुख्माई देवस्थान ट्रस्टने विनामूल्य सभागृह व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

अभ्युदय बहुउद्देशीय संस्थेकडून हिंदी साहित्यिकांना हिंदी सेवा प्रचारक सन्मान प्रदान



वर्धा : शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या अभ्युदय बहुउद्देशीय संस्था, वर्धा कडून हिंदी सेवक प्रचारक सन्मान सोहळा २०२५-२६ चा कार्यक्रम रविवार, १० मे रोजी धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, नागपूर येथे आयोजित केला.

कार्यक्रमाचे उद्घाटन नागपूरचे सी.ए. व साहित्यिक डॉ. तेजिंदर सिंह रावल यांनी केले. सोहळ्यात नागपूर येथील आभा सिंह, अर्चना राज चौबे, मधु पाटोदिया, मंजुषा किंजवडेकर, मुकेश कुमार सिंह, डॉ. राजेश काळे, डॉ. दिनकर येवलेकर, ज्ञानेश्वर टाकले, पारसनाथ शर्मा, एड. रेखा बाराहाते आणि वर्धा येथील दिलीप लकडे, विश्वजीत सेंदुरसे यांना हिंदी सेवक प्रचारक सन्मानाने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व पुष्प देवून सन्मानित केले गेले.

समारोहात प्रमुख अतिथी म्हणून वर्धेतील संत साहित्याचे अभ्यासक डॉ. नारायण निकम, विशेष अतिथी म्हणून अभ्युदय बहुउद्देशीय संस्थचे उपाध्यक्ष डॉ. विनय बाराहाते, तर अतिथी म्हणून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी बी.एस. मिरगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभ्युदय बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष वैद्यनाथ अय्यर होते. याप्रसंगी पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे संचालन अविनाश बागडे व अनिल मालोकार यांनी केले. अभ्युदय बहुउद्देशीय संस्थेचे महासचिव व सन्मान सोहळ्याचे संयोजक नरेंद्र दंढारे यांनी प्रास्ताविक केले. सन्मान प्राप्त डॉ. आभा सिंह, मुकेश कुमार, ज्ञानेश्वर टाकले, रेखा बाराहाते यांनी आपले मनोगत व?यक?त केले. डॉ. नारायण निकम यांचे स्वागत चेतन कुमार, बी.एस. मिरगे यांचे स्वागत प्रसाद कुमार, डॉ. विनय बाराहाते यांचे स्वागत दिलीप लकडे यांनी तर वैद्यनाथ अय्यर यांचे स्वागत सुरेखा उघडे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज?ज?वलन व सरस्वती पूजनाने झाली तर समारोप राष्ट्रगीताने झाला.

या सोहळ्यात नागपूरचे कवि व साहित्यिक एस.पी. सिंह, वर्धेचे ?ड. ताम्रध्वज बोरकर, अश्विन श्रीवास, सचिन सातपुते व मोठ्या संख्येने हिंदी प्रेमी उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत खामगाव पथकाने केले ग्रामपंचायत रामदरा चे मूल्यमापन



तळेगाव : राज्य शासनाच्या वतीने ग्रामीण भागाचा सर्वांगीन विकास व्हावा या दृष्टीने ग्रामपंचायत स्तरावर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे.

अभियान हे १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आले

अभियानात गावात ग्रामपंचायत भवन, ग्रामपंचायत रेकॉर्ड रजिस्टर, शाळा व शाळेतील सुविधा, अंगणवाडी व अंगणवाडीतील सुविधा,

अभ्यासिका, व्यायामशाळा, गावातील देवस्थाने, स्मशानभूमी तेथील सुविधा व ग्रामपंचायत ने तेथे केलेली वृक्ष लागवड, गावातील वृक्ष लागवड, गावातील नागरिकांनी लोकवर्गणीतून खरेदी केलेले बेंचेस, नागरिकांनी केलेले श्रमदान, ग्रामपंचायत ने राबविलेले आरोग्य शिबीर तसेच ?निमिया मुक्त गाव करण्यात आलेल्या उपाययोजना आणि ग्रामपंचायत ने पाणीपुरवठा योजना ही सौर ऊर्जेवर केलेली आहे अश्या अनेक गोष्टी या अभियानातर्गत ग्रामपंचायतने केलेल्या असून त्यानिमित्याने खामगाव येथून आलेले गटविकास अधिकारी शेख साहेब, विस्तार अधिकारी पंचायत घुगे साहेब, विस्तार अधिकारी कृषी बगळे साहेब यांनी मूल्यमापन केले.

त्यानिमित्ताने आधी त्यांचे ग्रामगीता व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले त्यावेळी सरपंच सौ. जोशनाताई संजयराव खरबडे, विपुल वसंतराव चौधरी,सर्व ग्रा. प. सदस्य,ग्रा.प. अधिकारी उतखेडे साहेब, जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक अंगणवाडीतील सेविका, आशा वर्कर, बचत गटाच्या महिला, ग्रा.प. माजी सरपंच संजय भुजाडे माजी उपसरपंच श्रीरामजी डहाके

ग्रा.प. कर्मचारी वैभव भुजाडे, संगणक परिचालक रुपाली पुनसे तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**प्रतिनिधी**

आधीच तयार असलेल्या बालाजी नगर मधील बगीच्या जागी नव्याने नमो उद्यान बनविण्याचा घाट

भाजपा तडस गट काँग्रेस नगरसेवकांची पत्रकार परिषद



देवळी : आज नगरपरिषद देवळी येथील सभागृहात भाजपा तडस गटाचे उमेश कामडी गटनेता, नगरसेवक अनिल कारोटकर, विजय गोमासे, रविंद्र कारोटकर, शिक्षण सभापती शुभांगी कुर्जेकर, बाल कल्याण सभापती मनीषा लोखंडे, ज्योती खाडे, विभा बजाईत, विश्वजीता पोटदुखे,ललिता धुर्वे,कॉंग्रेसचे नगरसेवक मिलिंद देशमुख यांनी संयुक्तरित्या पत्रकार परिषद घेत नगरपरिषद प्रशासनावर वर्धा रोडवरील बालाजी पार्क मध्ये आधीच तयार असलेल्या बगीच्यात नव्याने नम उद्यान ८८ लाख रुपये खर्चून तयार करण्यात येण्यावर गंभीर आरोप केले.

वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान २०२५/२६ अंतर्गत प्रभाग क्रं. २ वर्धा रोड शेत सर्वे नंबर ५९७ जुना सर्वे क्र. ९३/२ बालाजी नगर मधील ओपन स्पेस ४८३७.१० चौ. मी. नमो उद्यान विकसित करण्याबाबत तुलनात्मक रित्या सर्वात कमी दराने निविदा दरास सभेच्या दरमंजुरीबाबत विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर ठिकाणी आधीच लेआउट धारकाने नगरपरिषदेच्या मान्यतेने उद्यान केले असल्याने निविदा दरास मंजुरीबाबत अकरा सदस्यांनी विरोध दर्शविला बालाजी लेआउट वर अस्तित्वात लावून धारकांनी विकसित केलेल्या सुसज्ज बगीच्यावर नमो उद्यान ८८ लक्ष रुपयाचा टेंडर करून गैरव्यवहार करण्याचा बेत होता.

वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान सन २०२५ २६ अंतर्गत नगरपरिषद्वारा नमो उद्यान देवळी शहरात करण्याकरिता कोणत्याही सदस्याची नाराजी नसून नमो उद्यानाला विरोध नाही नमो उद्या शहरात झाले पाहिजे ही सर्वांची इच्छा आहे नमो उद्यानात नागरिकांसाठी आधुनिक सुविधा हरित परिसराने मनोरंजनाची साधने उपलब्ध करून देण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे परंतु अस्तित्वात असलेल्या सुसज्ज उद्यानावरच नमो उद्यान होत असेल तर मंजूर शासन निर्णय नुसार व्हायला हवे शासन निर्णय नुसार अविकसित जागेमध्ये नमो उद्या न विकसित करणे गरजेचे आहे. या नमो उद्यान करिता ८८ लक्ष रुपयाचे टेंडर सुद्धा काढण्यात आलेले होते परंतु या बालाजी लेआउट मालकांनी नगरपरिषद देवीच्या मान्यतेने बगीचा अगोदरच तयार करून देण्यात आलेला आहे व तयार असलेल्या अशा बगीच्या मध्ये नमो उद्यानाची निर्मिती करणे संशयास्पद आहे यावरून असे दिसून येते की नव्या व उद्यानाचा हाच बगीचा दाखवून निधीचा प्रशासनाद्वारे गैरव्यवहार करण्याचा प्रकार आज झालेल्या विशेष बैठकीमध्ये नमो उद्यान न मुद्दा तडस गट व कॉंग्रेसने लावून धरला यामध्ये नमो उद्या देवळी शहरात व्हावा यासाठी सर्व सदस्यांनी होकार दिलेला आहे परंतु देवळी प्रभाग क्रमांक दोन वर्धा रोड शेत सर्वे क्रमांक ५९७ जुना सर्वे क्रमांक ९३/२ बालाजी लेआउट मधील ओपन स्पेस ४८३७.१० चौ. मी. मध्ये बालाजी लेआउट मालकांनी नगरपरिषद देवळीच्या मान्यतेने सुसज्ज असा बगीचा आधीच तयार केला असल्यामुळे देवळी शहरातील दुसरी जागा पाहून त्या जागेवर नमो उद्यान निर्मिती करावी अशी मागणी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून भाजपा तडस गट व कॉंग्रेसच्या नगरसेवकांनी केली.

तब्बल आठ वर्षांनी वर्धा जिल्ह्याला आरोग्य राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र.!

डॉ. रेश्मा बोरघरे व डॉ आनंद झाडे आणी टिम यांच्या अथक परिश्रमामुळे पीएचसीचा राष्ट्रीय स्तरावर यशाचा टप्पा

प्रतिनिधी/योगेश काबंळे

गौळ : प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगाव यांनी एनक्वास (ँए) मानांकनामध्ये राष्ट्रीय स्तरावर पात्र ठरण्याचा मान मिळविला असून, या यशामागे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. रेश्मा बोरघरे यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले आहे.

सदर तत्कालिन वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळात डॉ. अदिती लांबट आरोग्य सहाय्यक दिलीप उटाणे, शाम जोशी स्वाती धोंगडे, सामुदायिक आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी. आशा व गटप्रवर्तक औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी कनिष्ठ लिपिक वर्ग चार कर्मचारी यांच्या मदतीने केंद्राच्या गुणवत्ताबाढीसाठी अत्यंत नियोजनबद्ध व सातत्यपूर्ण प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली पायाभूत सुविधा, स्वच्छता, सेवा वितरण, रुग्णाभिमुखता आणि नोंदवही व्यवस्थापन यामध्ये लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या. त्यांच्या मेहनतीमुळेच आणी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले , अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नलिनी विखे,माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर डॉ.भागवत राऊत डॉ.प्रशांत वाडीभस्मे डॉ. विनीत झलके डॉ.संदीप नखाते तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोनाली मामीलवार यांच्या मार्गदर्शनात प्राथमिक आरोग्य केंद्राने प्रथम राज्यस्तरावर पात्रता मिळवली.

दरम्यान, त्यांच्या बदलीनंतरही त्यांनी तयार केलेल्या मजबूत पायाभूत व्यवस्थेच्या आणि प्रणालीबद्ध कामकाजाच्या जोरावर आरोग्य केंद्राने पुढे वाटचाल करत राष्ट्रीय स्तरावरही पात्रता मिळवली. हे यश त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनाचे आणि केलेल्या कठोर परिश्रमाचे फलित असल्याचे स्पष्ट होते.

सध्या त्या केंद्रात कार्यरत नसल्या तरी त्यांच्या योगदानामुळेच हे यश शक्य झाले असून, त्यांच्या कार्याची दखल घेणे ही संस्थेची जबाबदारी आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे मनापासून कौतुक होत आहे

दें

वर्धा जिल्ह्यातातील शाहूर आरोग्य केन्द्राने २०१८ साली तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉक्टर भागवत राऊत यांच्या नेतृत्वात गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त केले होते

तब्बल आठ वर्षांनी राष्ट्रीय स्तरावर आरोग्य सेवेत वर्धा जिल्ह्याचे नाव प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगाव यांनी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन माननकरणांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करीत राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त केले ही वर्धा जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

नागपूर परिमंडळाचा सौर विजय: १ लाख घरांवर सौर क्रांतीचा झेंडा, राज्यात नागपूरचा १७.७२ टक्के वाटा



नागपूर : केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पंतप्रधान सूर्यघर - मोफत वीज योजने'ने देशात स्वच्छ आणि स्वस्त ऊर्जेची नवी लाट निर्माण केली असून, या मोहिमेत महावितरणच्या नागपूर परिमंडळाने एक ऐतिहासिक शिखर सर केले आहे. नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ७०८ ग्राहकांनी आपल्या घराच्या छतावर सौर वीज निर्मिती प्रकल्प यशस्वीरीत्या उभारून या क्रांतीत सहभाग नोंदवला आहे. विशेष म्हणजे, राज्यातील महावितरणच्या कार्यक्षेत्रात कार्यान्वित झालेल्या एकूण सौर वीज निर्मिती प्रकल्पांपैकी एकट्या नागपूर परिमंडळाचा वाटा तब्बल १७.७२ टक्के इतका मोठा असून, स्थापित क्षमतेत हा वाटा १७.७८ टक्के आहे. या कामगिरीमुळे नागपूर परिमंडळ राज्याच्या सौर नकाशावर अग्रस्थानी झळकत आहे.

या सौर क्रांतीत नागपूर जिल्ह्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जिल्ह्यात ८२ हजार ६०१ ग्राहकांनी सौर ऊर्जेचा स्वीकार केला असून, वर्धा जिल्ह्यातील १८ हजार १०७ ग्राहकांनीही या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या एकूण १ लाख ७०८ सौर प्रकल्पांची एकत्रित वीज निर्मिती क्षमता ३८२.६ मेगावॅट इतकी प्रचंड आहे. यात नागपूर जिल्ह्याचा वाटा ३१७.८२ मेगावॅट, तर वर्धा जिल्ह्याचा वाटा ६४.७६ मेगावॅट इतका आहे.

संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केल्यास, महावितरणच्या कार्यक्षेत्रात आजवर ५ लाख ६८ हजार २९३ ग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे. या सर्व प्रकल्पांची एकूण स्थापित क्षमता तब्बल २१५१.६९ मेगावॅटवर पोहोचली आहे. सामान्य कुटुंबांना दरमहा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळवून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे केंद्र सरकारकडून मिळणारे थेट अनुदान. १ किलोवॅटसाठी ३० हजार, २ किलोवॅटसाठी ६० हजार, तर ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ७८ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाते. सौर संचासाठी केलेली गुंतवणूक साधारण ३ ते ४ वर्षांत वीज बिलाच्या बचतीतून वसूल होते आणि त्यानंतर पुढील २० ते २५ वर्षे ग्राहकांना मोफत किंवा नाममात्र खर्चात वीज उपलब्ध होते. यामुळे घरगुती बजेटवरील विजेच्या बिलाचा ताण कायमचा संपुष्टात येतो.

या योजनेत 'नेट मीटरिंग'ची विशेष सोय आहे. ग्राहकाने उत्पादित केलेली वीज स्वतःच्या वापरापेक्षा जास्त असल्यास ती ग्रीडद्वारे महावितरणला दिली जाते. या अतिरिक्त विजेचा मोबदला ग्राहकाच्या बिलात समायोजित केला जातो किंवा त्याचे पैसे मिळतात. यामुळे ग्राहक आता केवळ वीज वापरकर्ता न राहता स्वतः वीज निर्माता बनला आहे.

वाढत्या जागतिक तापमानाच्या काळात सौर ऊर्जा हा सर्वात शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्याय आहे. म्हणूनच नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील उर्वरित नागरिक, गृहनिर्माण सोसायट्या आणि फ्लॅट धारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. इच्छुकांनी आजच जेस्ट्रॅक्ट्रॅन या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करून आपले घर 'सूर्यघर' बनवावे आणि राष्ट्र उभारणीसह हरित ऊर्जेच्या चळवळीत योगदान द्यावे, असे आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे. या योजनेमुळे केवळ वैयक्तिक आर्थिक फायदाच नाही, तर देशाच्या ऊर्जा सुरक्षेलाही मोठी शक्ती मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना भूसंपादनाचे पैसे तातडीने द्यावे - मंत्री संजय राठोड

सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या समवेत घेतला आढावा



मुंबई : जलसंधारण महामंडळ आणि शासन अंतर्गत प्रकल्पांच्या बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचे पैसे तातडीने देण्याच्या सूचना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिल्या.

मंत्रालयात आयोजित राधानगरी विधानसभा मतदारसंघातील जलसंधारण विभागाच्या विविध प्रलंबित आणि प्रगतीपथावरील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राधानगरी, भुदरगड आणि आजरा तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने गतीने कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री संजय राठोड यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जलसंधारण कामांमुळे भविष्यात शेतीसाठी पाणी उपलब्धता वाढून परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

बैठकीत राधानगरी तालुक्यातील लघु पाटबंधारे तलाव पाल, बनाचीवाडी, साठवण तलाव आपटाळ आणि कुक्कडवाडी या योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच भुदरगड तालुक्यातील वासनोली, कारिवडे, चिवाळे, आप्पाचीवाडी, पडखंबे येथील लघु पाटबंधारे तलाव, मठगाव पाझर तलाव आणि पंडिवरे साठवण तलाव यांचाही आढावा घेण्यात आला. आजरा तालुक्यातील पेरनोली आणि देवकांडगाव साठवण तलाव योजनांच्या कामांच्या प्रगतीवरही चर्चा करण्यात आली.

नाचणगाव परिसरात नियमित व समान पाणीपुरवठा करण्यात यावा

नागरिकांची गैरसोय दूर करण्यात यावी, अन्यथा शिव सेना करेल आंदोलन



पुलगांव : लगत आपल्या ग्रामपंचायत क्षेत्रातील नाचणगाव परिसरामध्ये सध्या तीव्र उन्हाळ्याचे दिवस सुरू असताना देखील नागरिकांना नियमित व वेळेवर पाणीपुरवठा करण्यात येत नाही. शासनाच्या नियमानुसार व नागरिकांच्या मूलभूत गरजांचा विचार करता किमान दोन दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात आठ-आठ दिवस नंतर पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

सदर प्रकारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक व गरीब कुटुंबांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत असून नागरिकांचे हाल होत आहेत. विशेष बाब म्हणजे काही उच्चभ्रू व विशेष कॉलनीमध्ये नियमित पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती समोर येत असून सामान्य व गरीब नागरिकांच्या वस्त्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. ग्रामपंचायतीची ही दुटप्पी व भेदभावाची भूमिका अत्यंत निषेधार्ह व संशयास्पद आहे.

पिण्याचे पाणी हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून त्याबाबत होत असलेली निष्काळजीपणा व प्रशासनाची उदासीनता कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. त्यामुळे नाचणगाव परिसरात तात्काळ नियमित, समान व सुरळीत पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा तसेच पाणीटंचाईमुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची गंभीर दखल घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, ही मागणी करण्यात येत आहे.

अन्यथा, ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात शिवसेना आपल्या लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडेल व उद्भवणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावीनिवेदन देते वेळी वर्धा जिल्हा प्रमुख आशिष पांडे, देवळी विधानसभा प्रमुख नरेश सिंह ठाकूर, पुलगावं शहर प्रमुखं राकेश कचवाह , अल्पसंख्यक सेल चे जिल्हा संघटक अकील शेख, साहिल दळवी, बंटी पराते, वैभव बकाने यांच्या सह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते .

आंबे घेऊन जाणारा ट्रक उलटला, अपघातात पादचारी गंभीर

वर्धा - आर्वी मार्गावरील खरांगणा (मोरांगणा) शिवारातील अपघात



वर्धा : आंबे घेऊन जाणारा ट्रक उलटल्याने घडलेल्या अपघातात ट्रकची धडक लागल्याने पादचारी गंभीर जखमी झाला. हा अपघात ११ मे रोजी सकाळी सहा वाजताच्या सुमारास वर्धा - आर्वी मार्गावरील खरांगणा (मोरांगणा) शिवारात घडला.

तेलंगणा राज्यातील सिद्धीपेठ येथून एमपी १३ जीबी २८४१ क्रमांकाचा ट्रक एस एस फ्रुट कम्पनी आष्टा भोपाळ येथे आंबे घेऊन जात होता. दरम्यान, खरांगणा (मोरांगणा) शिवारात सकाळी सहा वाजताच्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटला. यावेळी रस्त्याच्या कडेला पायदळ जात असलेल्या दिवाकर लाडे (वय ६५) यांना ट्रकने धडक दिली. त्यात दिवाकर लाडे गंभीररीत्या जखमी झाले. दिवाकर लाडे यांना सेवाग्राम रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. ट्रक उलटल्याने जोरात आवाज झाला. आवाज येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांना माहिती देत मदतकार्य केले.

-- घटनास्थळी खरांगणा (मोरांगणा) पोलिस ठाण्याचे कर्मचारी सतीश वैरागडे, प्रवीण राठोड, अंकुश साबळे, रवींद्र मोहर्ले, सतीश अहेर यांनी भेट देत पंचनामा करत केला.

बालगृहातील ७१५ बालके दहावीत उत्तीर्ण; मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून अभिनंदन !



मुंबई : प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बालगृहातील ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादन करत सकारात्मक जीवनाचा मार्ग अवलंबिला आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध बालगृहातील एकूण ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादित केले असून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सकारात्मक जीवनाचा मार्ग स्वीकारत उल्लेखनीय यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच बालगृहांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा, मार्गदर्शन आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. बालगृहातील या मुलांचे ऑनलाईन सेशन घेण्यात आले, तसेच त्यांचा सराव घेण्यात आला. शिक्षकांचे विशेष वर्ग या दहावीच्या मुलांसाठी आयोजित करण्यात आले होते. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यानंतर मुंबई उपनगर येथील बालगृहातील ८८, अहिल्यानगर येथील ८०, तर बीड येथील ४७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. ठाणे जिल्ह्यात ४२, सोलापूर येथे ३९, तर कोल्हापूर येथे ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांनी उच्च गुणांची नोंद केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याने ९५.२० टक्के गुण मिळवले असून द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्याला ८६ टक्के गुण मिळाले. तसेच बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांकासाठी ९४ टक्के, तर द्वितीय क्रमांकासाठी ९२.४० टक्के गुणांची नोंद झाली आहे. पुणे, सोलापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनीही ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. काही जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी गुणवत्तापूर्ण निकाल लागल्याचे दिसून आले. नंदुरबार, लातूर, नाशिक आणि नागपूर येथील विद्यार्थ्यांनीही चांगली कामगिरी केली आहे.

वाढत्या तापमानाच्या संकटावर 'पिक विविधता' उत्तम पर्याय : डॉ. जीवन कतोरे यांचे आवाहन

शेतकरी शास्त्रज्ञ मंच सभे दरम्यान शेतकऱ्यांना मार्गदर्शन



वर्धा : डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा स्थापित शेतकरी शास्त्रज्ञ मंच सभा हिंगणघाट तालुक्यातील भगवा येथील प्रगतीशील शेतकरी श्री. बलराज श्योखंड यांच्या शेतावर आयोजीत करण्यात आली. सध्याच्या बदलत्या हवामानात आणि अनिश्चिततेच्या काळात शेतकऱ्यांनी केवळ पारंपारिक पिकांवर अवलंबून न राहता पिक विविधता अंगीकारणे काळाची गरज आहे, या विषयावर शेतकरी-शास्त्रज्ञ मंच सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. दिलीप पोहाणे, सदस्य श्री. इरफान अली, निलेश नाखले, सिंजेंटा फाऊंडेशन चे श्री. भूषण गाडेगोणे, डॉ. भारती तिजारे, विषयतज्ञ (कृषिविद्या), डॉ. सचिन मुळे विषयतज्ञ (पशु संवर्धन व दुग्धशास्त्र), डॉ. अंकिता अंगाईतकर विषयतज्ञ (विस्तार शिक्षण) यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना महत्वाच्या मुद्द्यांवर भर देत शास्त्रीयदृष्ट्या ही झाडे पावसाच्या पाण्याचा वेग कमी करून ते जमिनीत मुरण्यास मदत करतात. मोठ्या प्रमाणावर कार्बन साठवून ठेवल्यामुळे क्लायमेट चेंज च्या परिणामांविरुद्ध लढण्यास मदत होते तसेच शेतात झाडांची संख्या वाढल्यामुळे मित्र कीटक आणि पक्ष्यांचा वावर वाढतो, जो नैसर्गिक कीड नियंत्रणासाठी उपयुक्त ठरतो असे मार्गदर्शन केले तसेच वाढत्या तापमानाच्या संकटावर पिक विविधता उत्तम पर्याय आहे याचा शेतकऱ्यांनी अवलंब करावा असे आवाहन या प्रसंगी त्यांनी केले.

श्री. बलराज श्योखंड मुळचे हरियाणा येथील असून हिंगणघाट तालुक्यातील भगवा येथे १० वर्षांपूर्वी शेती करण्याकरिता स्थायिक झाले. यांनी आपल्या शेतात कापूस, सोयाबीन यांसारखी पारंपारिक पिके न घेता बांबू, निलगिरी आणि सरू या झाडांची लागवड करून एक नवीन प्रयोग केला आहे. पुढे ॲग्रोटूरीझम तयार करण्याचा त्यांचा मानस आहे. सभेला उपस्थित असलेल्या शास्त्रज्ञांनी आणि इतर शेतकऱ्यांनी या उपक्रमाची पाहणी केली. कमी कष्ट आणि शाश्वत उत्पन्नाचा स्रोत म्हणून या वृक्ष लागवडीकडे पाहिले जात आहे.

बांबू इतर झाडांच्या तुलनेत अधिक ऑक्सिजन वातावरणात सोडतो. हा वृक्ष कार्बन शोषून घेण्याचे (ऍंदह एलिॅंग्दह) उत्तम साधन आहे, ज्यामुळे जागतिक तापमान वाढ रोखण्यास मदत होते.

ज्या जमिनीत इतर पिके येत नाहीत किंवा जी जमीन पाणथळ आहे, तिथे निलगिरी उत्तम वाढते. ही झाडे जमिनीतील क्षारांचे प्रमाण नियंत्रित करण्यास मदत करतात. अत्यंत कमी वेळात जास्त लाकूड (बायोमास) देणारे हे झाड असल्याने कागद उद्योग आणि इंधनासाठी हे उत्तम स्रोत आहे. सरूच्या मुळांवर 'फ्रँकिया' (Frankia) नावाचे जिवाणू असतात. हे जिवाणू हवेतील नत्र शोषून जमिनीत स्थिर करतात, ज्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो. असे मार्गदर्शन शास्त्रज्ञांनी या प्रसंगी केले. बांबू आणि निलगिरी सारख्या पिकांना सुरुवातीचा काळ सोडल्यास जास्त देखभालीची गरज नसते. औद्योगिक कारणांसाठी बांबू आणि निलगिरीला असलेली वाढती मागणी लक्षात घेता, हे प्रयोग आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत आहेत.

शेतकऱ्यांनी बाजाराची मागणी ओळखून आपल्या शेती पद्धतीत बदल करायला हवा. या प्रसंगी शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधता आल्यामुळे आणि प्रत्यक्ष शेतावर जाऊन प्रयोग पाहता आल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

सदर सभेचे सूत्रसंचालन विस्तार शिक्षण विषयतज्ञ डॉ. अंकिता अंगाईतकर यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता श्री. गजेंद्र मानकर, श्री. गणेश वायरे व ग्रामस्थांनी योगदान दिले.

बोर नदीकाठी अवैध मोहाभट्टीवर पोलिसांचा धडक छापा

१ लाख ७९ हजारांचा मुद्देमाल जप्त आरोपी जंगलात पळून फरार



सेलू : तालुक्यातील मौजा घोराड-पिंपळखुटा शिवारात सुरू असलेल्या अवैध गावठी मोहादारूच्या अड्डयावर पोलिसांनी मंगळवारी ता. १२ ला दुपारी १२.३० वाजता धाडसी कारवाई करत मोठ्या प्रमाणावर कच्चा माल व साहित्य जप्त केले. बोर नदीच्या काठावरील झाडीमध्ये सुरू असलेल्या या हातभट्टी व्यवसायावर पोलिसांनी अचानक छापा टाकल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कुणाल उर्फ केशव भाउराव पचारे रा. सेलू हा बोर नदीलगत माधवराव झलके यांच्या शेताजवळ झाडीच्या आडोशाने अवैध मोहादारू गाळण्याचा व्यवसाय चालवत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पंच व पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकला.

छाप्यादरम्यान आरोपी दारूभट्टी लावण्याची तयारी करताना दिसून आला. मात्र पोलिसांची चाहूल लागताच त्याने जंगलाच्या दिशेने पळ काढला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला, मात्र तो फरार होण्यात यशस्वी झाला.

घटनास्थळी पंचासमक्ष पाहणी केली असता, अवैध मोहादारू निर्मितीसाठी उभारण्यात आलेल्या तब्बल सहा विटांच्या चुली, सहा लोखंडी भट्टी ड्रम, तसेच प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे आठ लोखंडी ड्रम मोहासडवा रसायनाने भरलेले आढळून आले. याशिवाय जर्मनी घमेले, नेवार पट्टया, पातेली, टिनाचे पीपे, प्लास्टिक डबे आणि मोठ्या प्रमाणावर जळाऊ लाकूडही जप्त करण्यात आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी १६०० लिटर कच्चे मोहासडवा रसायन, भट्टी साहित्य व इतर उपकरणांसह एकूण १ लाख ७९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेले रसायन व साहित्याची घटनास्थळीच तोडफोड करून नाश करण्यात आला.

ही कारवाई दुपारी एक वाजेपर्यंत सुरू होती. त्यानंतर पोलिस पथक सी.ए. नमुन्यांसह पोलीस ठाण्यात परतले. फरार आरोपी कुणाल उर्फ केशव भाउराव पचारे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात व ठाणेदार मनोज गभणे यांच्या निर्देशावरून सहायक पोलीस उपनिरीक्षक निरंजन वरभे, जमादार तुषार भुते, मंगेश राऊत यांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.